
कार्तिक हजारे
मुक्ती

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मुक्ती

(लघुकथासंग्रह)

## लेखक : कार्तिक गुलाब हजारे

# मुक्ती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मुक्ती

लेखक : कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

इ मेल... karthikhajare@gmail.com

फेसबुक... https//www. facebook. com...Karthik hajare

पत्ता... मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३.. मींथूर् पोस्ट - नवेगाव (पांडव). तालुका - नागभिड जिल्हा – चंद्रपूर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १५ फ़ेब्रुवारी २०२०

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावना...

प्रिय वाचक बंधू आणि भगिनींनो,तसेच ई साहित्य वेबसाईट वरील सर्व मान्य वरांना माझा सस्नेह नमस्कार....

इ साहित्य वरील लेख व वाचन सामग्री अत्यंत सरहानिय आहे. आणि तसेच मी येथील एक वाचक सुद्धा आहे. इतकी छान पुस्तकांची विनामूल्य रास देण्याकरिता मी ई साहित्याचे आभार मानतो.

लेखक आमचे मित्रच असून मी त्यांची "प्रेमाचे अस्तित्व" ही लघु कादंबरी वाचली. मला ती खूप आवडली. आणि परत काही दिवसांतच त्याचे दुसरे पुस्तक "काही राहून गेलं होतं" ही पुन्हा एक सुंदर रचना आपल्या समोर त्यांनी मांडली. प्रत्येक पुस्तकाला विचार करायला लावणारा एक वेगळाच पैलू त्यांच्या पुस्तकात मला दिसून आला. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

प्रस्तुत कथेच्या संचातून परत एकदा त्यांचे उत्तम लिखाण आपल्या समोर येत आहे, तरी माझी सर्वांना विनंती आहे की त्यांनी स्वतंत्रपणे प्रस्तुत पुस्तक वाचून कसे वाटले त्याबाबत लेखकांना कळवावे. आणि स्वतःच्या अभिप्रायांनी त्यांना प्रेरित करावे...

धन्यवाद..

मृदुला पंकज माकोडे
... नागपूर...

ओळख



वाचनाची आवड मला तशी लहानपणा पासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचु शकतो? याची प्रचिती मला सुखदेवे सर नेहमी द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने शाळेतील कित्येक संस्कृतिक भागात माझी आवर्जून निवड व्हायची. पण कालांतराने आर्थिक परिस्थिती मुळे माझी शाळा सुटली आणि अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो.
कालांतराने तेही बंद झाले. कारण कामाच्या व्यापात मी अडकत राहिलो. पण सवयी प्रमाणे वि. स. खांडेकर,सुहास शिरवळकर अशा बऱ्याच लेखकांच्या पुस्तिका मी वाचून काढायचो. त्यातून माझ्यातल्या कलाकाराचा एक नवीन जन्म व्हायचा. आणि मी परत शुरुवात केली.

"कुणाच्यातरी आठवणीत" ही माझी पहिली कविता. जी आजही बेधुंद लहरी माध्यमावर झळकते आहे. पुढे कथा,कविता,लेख,चारोळी असे बरेच प्रकार त्यात समावेश करू लागले. पण काहीतरी लिहायचं? हा प्रश्न मनातून जाईना. कादंबऱ्या वाचताना मी पात्रांची,भावनांची विचारसरणी व्यक्त करत गेलो. आणि नव्या जोमाने लिहायला लागलो.

शब्दांचा हा निरंतर प्रवास,
संपूच नये कधी...
आयुष्य जगुनी जावे,

शब्दांच्या परी..


असावे वळण आयुष्याला,


शब्दांच्या संगतीचे...

अगदी अश्रुसुद्धा गोठतात,

शब्दांच्या घरी...

लिहायला जितकी भीती वाटत नाही ना,एक प्रकारे तिचं भीती आपलं लिखाण दुसऱ्याकडे दिल्यावर वाटते. आपल्या भावना,आपले विचार त्यांना पटतील का? आपलं लिखाण त्यांना आवडेल का? पण केला प्रयत्न... आणि थोडाफार यशस्वी झालो. आणि आता त्याच थोड्याफार प्रयत्नाने लिहत आहे.




http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/premacha_astitv_kartik_hajare.pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/krgh_kartik_hajare.pdf

माझी आधीची दोन्हीही पुस्तके वाचून त्यावरही आपला अभिप्राय कळवावा ही विनंती.

# मनोगत...

माझं पाहिलं पुस्तक "प्रेमाचं अस्तित्व" याला आपल्याकडून फार चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांनतर काही कालावधीतच माझं दुसरं पुस्तक "काही राहून गेलं होतं"प्रकाशित झालं. कितीतरी वाचकांनी मला त्याबद्दल ईमेल करून स्वतःचे अभिप्राय कळवले. काहींनी कॉल एसएमएस करून कळवले. त्याबद्दल मी त्यांचा निरंतर आभारी आहे.

दुसरं पुस्तक प्रकाशित करताना मी म्हटलं होतं की लवकरच "पेरजागढ.. एक रहस्य"ही पुस्तक आपणासमोर मांडणार. पण हल्ली काही विशिष्ठ कारणामुळे ती पुस्तक उशिराने आपणांस मिळेल. त्याबद्दल क्षमा असावी.

कारण शेवटी लेखकाचाही एक आयुष्य असते. पुस्तकाचं आयुष्य रंगवताना त्याचं आयुष्य रंगवण्याचे त्याच्या लक्षातच नसते. आणि नेमके तेच माझ्याही बाबतीत घडते आहे. त्यामुळे येणाऱ्या पुस्तकांना फार प्रमाणात उशीर होणार आहे.

प्रेमात विरह,यातना दडलेल्याच असतात. पण काही वेळा कुणाचं आयुष्य पण त्यात हरवलेलं असतं. कुणी सावरत असते तर कुणी कोसळते. काही वेळा आस्थापण मानवी जीवनाच्या वर वर्चस्व गाठते. असेच काही विचार या पुस्तकद्वारे मांडल्या गेले आहे.

मला ई साहित्य मध्ये काम करण्याची सुवर्ण संधी दिल्याबद्दल मी माननीय सुनील सामंत यांचे आभार मानतो. आणि तसेच दोन्ही पुस्तकांचे मुखपृष्ठ आणि इतर काही गोष्टींची कमतरता भासवली नाही त्याबद्दल त्यांच्या टीमचे सुद्धा आभार मानतो.

आणि इच्छूक वाचकांच्या आग्रहास्तव मी सादर करतो काही लघु कथांचा संग्रह...
... मुक्ती...

# मुक्ती

अनुक्रम


१) अबोल अश्रू..

२) मी अधुरा....

३) देऊळ कशासाठी...

४) मी एकटा...

५) मुक्ती...

६) नकार

७) प्रेमवाद

८) बदला..

९) सहवासाचे वेड

१०) शेवटची भेट...

# १) अबोल अश्रू...

मित्रांनो आपण प्रवासामध्ये अनेक गमती जमती बघतो. कित्येकांचे तर अख्खं जीवनच प्रवासावर निर्धारित असते. वळणावरला प्रवास असो किंवा आयुष्यातला प्रवास असो. प्रवास करायला सगळ्यांना आवडते. आज मी अश्याच एका प्रवासाचे वर्णन आपल्या समोर सादर करीत आहे.

त्या दिवशी मी औरंगबाद वरून निघालो होतो. त्या गर्दीत इतका ढवळून निघालो होतो की नागपूरला जाईपर्यंत मी शिल्लक तरी असेन का नाही असं वाटतं होतं. कारण त्या जनरलच्या डब्ब्यात इतकी गर्दी उसळली होती की श्वास घेणेसुद्धा अगदी माझ्या जीवावर आलं होतं. पण काय करावं? शेवटी कसही करून मला नागपूरला पोहचायचच होतं. रिझर्व्हेशनच्या नावाखाली मित्रांनी माझी चांगलीच फजिती केली होती. त्यामुळे प्रत्येक क्षणाला त्यांना शिव्या शाप देत मी त्या गर्दीत झोप घेण्याचा प्रयत्न करत होतो.

फायनली त्या गर्दीत तो माझा पहिला प्रवास होता. त्यामुळे स्वतःची मला इतकी कीव येत होती की कुठेतरी उतरून जावे हा विचार सतत डोकावून जायचा. पण दरवाजापर्यंत जावे तेव्हाच ट्रेन सुटून जायची. इतकी चेंगट गर्दी ताणली होती.

शेवटी कित्येक तासांच्या खडतर प्रवास केल्यानंतर परभणी नाशिकला थोडी गाडी रिकामी झाली. आणि एकदाची मला बसायला जागा मिळाली. जरा खिडकीतून बाहेर बघत हायस करू लागलो. पण गर्दीच्या विळख्याने माझी झोप ही अर्धवट झाली होती. त्यामुळे खिडकीतून येणाऱ्या त्या हवेच्या झोकेमुळे मला झोपेच्या डुलक्या सतावत होत्या. कशी झोप लागली... काही कळलंच नाही. पण मग कुठेतरी गाडी थांबल्याने मला जाग आली.

खिडकीतून बघितलं.. माझ्या ओळखीचा प्रदेश आता दिसू लागला होता. त्यामुळे आता झोपण्यात काही तथ्य नाही हे लक्षात घेऊन मी बॅग मधून पाण्याची बॉटल बाहेर काढली आणि

हलकेच चेहऱ्यावर शींतोडे मारले. चेहरा थोडं रुमालाने पुसुन घेतल्यासारखा केला आणि स्वतःला थोडं फ्रेश केलं. हळुवार सभोवार नजर पसरवली आणि डब्ब्यात असणारी गम्मत जम्मत बघू लागलो.

समोरच्या शीटवर तीस पस्तीसितली एक महिला येऊन बसली होती. तिच्या मांडीवर दोन ते तीन वर्षाची एक निरागस, गोंडस चेहऱ्याची एक छोटीशी मुलगी खेळत होती. मला लहानपणापासून छोट्या छोट्या मुलींचं भारी लाड यायचं. मी तिला हसवण्याचा प्रयत्न करत होतो.

खरंच काय सुरेख हसत होती ती... ते निष्पाप, नितळ हसणं काय लुभावत होते मनाला. भारी कौतुक येत होतं मला तिला बघून. प्रवासाचा सारा शीण त्या एका छोट्याश्या हसूने घालवले होते.

इतक्यात एक फेरीवाला चहाची ऑर्डर घेत आला. आणि मी त्याला आवाज लावली. स्वतःसाठी एक चहा घेतला आणि त्या मुलीसाठी एक पारले जी बिस्कीटचा पाकीट.

चहा पिता पिता मी त्या इवल्याश्या मुलीकडे बघू लागलो. त्या महिलेने पॅकेट फोडून दोन बिस्कीट तिच्या हातात दिली. पण त्या मुलीला अख्खं पॅकेट हवा होता. हे सगळं मी कौतुकाने तिच्याकडे बघत होतो. पण जेव्हा ती रडायला बसली. तिला रडताना बघून एक आश्चर्याचा धक्काच बसला. ती रडत होती.. अश्रूंचे थेंब न थेंब तिच्या नाजुक गालावर ओघळत होते पण तिच्या रडण्याचा आवाज मात्र माझ्या कानापर्यंत येत नव्हता.

असं का व्हावं? म्हणून मी त्या महिलेला त्याचे उत्तर विचारलं. तर ती महिला म्हणाली.. ती जन्मापासून मुक आहे. तिला वाणी नाही. त्यामुळे ती बोलू शकत नाही.

हे सगळं ऐकून मला कसंतरीच झालं. चहा प्यायची सुद्धा इच्छा झाली नाही. चहाचं ग्लास असाच खिडकीद्वारे बाहेर फेकून दिला आणि त्या मुलीला स्वतःच्या अंगावर घेतले.. थोडं लाड, कौतुकाच्या असीम प्रयत्नानंतर परत एकदा ती गोड हसली. आणि तिचे ते गोड हसणे चक्क काळजात रुतून बसले.

एव्हाना माझा स्टॉप आला होता. मी उतरणारच होतो. पण त्या छोट्याश्या मुलीच्या अबोल अश्रूंनी माझ्या मनात एक वेगळीच जागा घेतली होती. जिचं रडू मला आयुष्यातलं एक सगळ्यात सुंदर रडू म्हणून वाटलं होतं.

# मी अधुरा....

मी माझं प्रेम असं काही खात्रेशिरप्रमाने सांगू शकत नाही. कारण ज्या प्रेमावर माझं विश्वास आहे ते आत्ता माझ्यासोबत असूनसुद्धा ते माझं नाही आहे. आणि मला असं वाटतं की माझ्या एकतर्फी प्रेमात मी कसलाच गैरव्यवहार केला नाही. ते कळेलही तुम्हाला..

ते उन्हाळ्याचे दिवस होते. ताईच्या लहान दिराचं लग्न होतं. आणि नुकतंच घराचं सूद्धा काही काम झालं होतं आणि योगायोगाने हे लग्नाचं स्थळ चालून आले होते. मी पेंटिंग करतो म्हणून ताईने ५_६ दिवसाच्या आधीच मला बोलावले होते. ताईचं लग्न झालं तेव्हापासून मी एकदा किंवा दोनदा तिच्या गावाकडे गेलो असेन. त्यामुळे तिच्या गावांत किंवा तिच्या नातेवाईकांत असं मला फारसे ओळखणारे कुणीच नव्हते. आणि मला न्यायला तिला दिरच आला असल्यामुळे मी नकार सुद्धा देऊ शकत नव्हतो.

छोटेखानी गाव होतं पण टुमदार वस्तीने ग्रासलेले होतं. एकच रस्त्याने अख्खं गाव फिरून यावं असं ते छोटंसं गाव. त्यामुळे माझं मन कधीच तिथे रमत नव्हतं. म्हणून आल्या आल्याच मी शहरातून पेंटिंग साठी लागणारे सगळे सामान आणलं आणि माझ्या कामाला शुरुवात केली.

तसं मानपानाला ताईच्या घरची मंडळी अगदी दिलखुलास होती. घराशेजारी एक मुलगा मला पानठेल्यातुंन पान वगैरे आणून देण्यासाठी होता. किंवा रिकामा असला की माझ्याजवळ येऊन बसायचा त्यामुळे मला थोडं बरं वाटायच.

सुरुवातीचे दोन तीन दिवस मी कुणाच्याही अडवणुकिशिवाय हॉल वगैरे पेंट केलं होतं. पण जसजसे लग्नाचे दिवस जवळ जवळ येत होते. तसतसे सगळ्यांची धावपळ चालू होत होती.

एव्हाना अप्तगणांची ये जा चालू झाली होती. आणि नाईटला थोडं भीतभीतच काम करावं लागायचं. कारण छोटंसं गाव असल्यामुळे लाईट केव्हाही ये जा करत असायची.

त्यादिवशी दरवाज्यात पान थुंकन्यासाठी मी थोडा बाहेर आलो होतो. आणि आत असलेल्या दमट वातावरणामुळे थोडाफार फ्रेश फील करत होतो. आणि तेव्हढ्यात अचानक तिच्याकडे लक्ष गेली.

पाराजावळ थांबलेल्या आटो मधून आपल्या आई वडिलांसह उतरुन ती इकडेच येत होती. जरासा गोल चेहरा, प्रवासामुळे कपाळावर घामाने चीपकलेले तिचे ओलेचिंब केस, काजळ माखलेले तिचे डोळे, आणि त्यावर ते छोटंसं अपरं नाक, ओठांवर चिक्कार करत एक गोड स्माईल केली. आणि बॅग धरून आत जाऊ लागली. तिच्या सावळ्या चेहऱ्यावरचे ते स्मितहास्य जणू एखादी कळी फुल्ल्यागत मनाला प्रसन्न करून टाकत होते. आणि तिच्या काजळ मुखी नयनांची नजर पर माझ्या काळजाला जाऊन भिडली होती. आणि न राहवून मनाला वाटलं की आपल्यालाही कदाचित अशीच एखादी नुर मिळायला हवी.

त्या मुला जवळ मी जेव्हा तिची चौकशी केली. तेव्हा तो म्हणाला ... ती माधुरी आहे. फारशी येत नाही... यंदा फर्स्ट इयर ला होती.. तुमच्या दाजीची चुलत बहीण आहे. ऐकल्यावर जरा हायसे वाटले. कार्यक्रमाचे दिवस जवळ येत होते आणि पेंटिंगची बारीक कामे अजून बरीच पडली होती. त्यामुळे थोडसं त्रास करत रोज रात्री जागरण करावं लागायचं.

हॉलच्या छतावर असलेल्या फुलांच थोडफार काम उरकून मी मग जेवण करायला चालला गेलो. तेव्हा ताईने मला विचारले...

काय रे तू माधुरी बरोबर काही बोललास काय?

नाही...

अरे ती मला विचारत होती. कोण व्हय तो?मी म्हटलं माझा भाऊ होय...

आणखी काय म्हणाली..

हे सुद्धा काम करते काय म्हणाली? बरच काही विचारत होती तुझ्याबद्दल. मला वाटतंय तिला तुझ्याबद्दल आकर्षण झालंय. बोलून घे आणि मोकळं करून टाक तिला..

हो... म्हटलं पण ताईला काय सांगणार की माझ्या मनात तिच्याबद्दल कात भावना तयार झाल्या आहेत ते. जेवण करून पण घेतला आणि परत स्टँडवर चढून आपल्या कामास रुजू झालो.

तितक्यात तीच चहाचं ट्रे धरून माझ्याकडे आली. आणि हाका मारू लागली.

काय आहे ?

चहा....

तू ताई कडूनच आली आहेस ना...

हो..

मग ताईने सांगितलं नाही का की मी चहा घेत नाही म्हणून..

नाही ..

जा पाणी घेवून ये प्यायला.. आणि ती पाणी आणण्यासाठी निघून गेली.

तिचं माझ्याशी बोलण्याच नाही निमित्त फार छान वाटलं. आणि जेव्हा तू घ्या द्या म्हणून मानाने बोलायची तेव्हा अजून मला तिचं भारी नवल वाटायच. मी काम करायला बसलो की ती माझ्याबद्दल स्वतःबद्दल गप्पांची देवाण घेवाण करायची. त्या एकाच चहाच्या प्रसंगात आमच्यात असलेला परकेपण तिने क्षण दिशी उडवून टाकले. आणि आम्ही बोलायला फ्री झालो. पण त्याही वेळेस ताईची नजर आमच्यावर खिळून होती.

कारण दिवसभराचं ठीक होतं. पण जेव्हा मला रात्रीची वेळ व्हायची त्याही वेळेस ती माझ्या बरोबर असायची. त्यामुळे मला काही लागलं? किंवा मला कशाची आवश्यकता भासली की ती पूर्ण करायची. आणि जेव्हापण ताई मला बोलावण्यासाठी यायची तेव्हा आम्ही दोघेही गप्पामध्येच असायचो. ताई सगळं जाणून बुजून मला विचारायची. पण मीच तिच्यातली शंका गप्पांमध्ये उडवून द्यायचो. त्या सहवासात मी तिच्यात इतका गुंतत चाललो होतो की क्षणभर मला ती दिसली नाही तर नजर सैरावैरा तिलाच शोधत असायची.

कार्यक्रम उद्या परवावर आला आणि घर पाहुण्यांनी दिवसेंदिवस भरू लागलं. वाढत्या पाहुण्यांनी भरत्या घरात तिला कुणीही हाका मारू लागले. त्यामुळे मला जे काही तिला सांगायचे होते ते मनातच राहू लागले. पण एक आशा होती...

उन्हाळ्याच्या दिवसांत आम्ही बाहेर गच्चीवर झोपायला जायचो. आणि तिथेही काही स्त्रियाबरोबर ती पण यायची. त्या वेळेस आमची परत एकदा भेट व्हायची. आणि मला वाटते तो माझ्या कामाचा शेवटचा दिवस होता. कारण दुसऱ्या दिवशी मांडव वाढणी ठरलेली होती.

आज व्हायलाच पाहिजे म्हणून जरा सकाळ पासूनच जोमाने कामावर रुजू झालो होतो. माधुरी एकदोनदा आली माझ्यापाशी. पण ती तेव्हढ्या पुरतीच होती. पण खरी गम्मत सायंकाळी घडली. हॉल ची फक्त दोन फुले राहिली होती. थोडफार व्हाईट करून मी मग माधुरीला बोलावणं पाठवलं. कलर मॅचींग करण्याकरिता पण तितक्यात जेवणाचा निरोप आला.

त्या दिवशी सगळं काम फायनल करायचं होतं त्यामुळे रात्र जरा जास्तच होणार होती. आणि आशा नसतानाही माधुरी माझ्यापाशी थांबून होती. जवळपास कुणी फिरकणारे नाही हे बघून घेतलं आणि तिला प्यायला पाणी मागितलं... पिण्याच्या पाण्याचा ग्लास धरून ती स्टँड च्या पहिल्या पायरीवर उभी होती. आणि मी उतरणार इतक्यात लाईट चालली गेली.

च्यायला... खेड्यातली हीच एक मोठी बाब आहे म्हणत मी हळूहळू खाली उतरू लागलो... आधीच माधुरीला सांगितलं तू जिथे आहेस तिथेच थांब मी खाली येत आहे म्हणून..

स्टँड वरून खाली येताना तिच्या खांद्याचा आसरा घेत मी खाली उतरलो. आणि जेव्हा अचानक लाईट आली तेव्हा मी तिच्या समोरासमोर उभा होतो. तिने डोळे गच्च मिटून घेतले होते. तसं माझं काही करण्याचा हेतू नव्हताच मुळी पण अंधारात ध्यानीमनी नसताना तिच्या सर्वांगावरून हात फिरून गेला होता. त्यामुळे तिच्या हृदयात वाढलेलं स्पंदन मला स्पष्टपणे ऐकू येत होते आणि जेव्हा मी तिच्या हातातला ग्लास माझ्या हातात पकडला ती लाजली आणि तिने मान खाली घातली.

पाणी पिऊन ग्लास तिच्या हातात परत देत असताना विचार आला. हीच संधी आहे आपण विचारून टाकुया... जे काय आहे मनात ते. ती समोरच उभी होती. क्षणभर तिच्या डोळ्यांत बघितलं आणि दोन्ही दंडांना पकडत म्हणालो..

बघ माधुरी.. मला अडखळत बोलायची सवय नाही... पण आज तुझ्याजवळ एक खरं सांगतो.. मला तू फार आवडतेस.. जर तुझं होकार असेल तर तुला लग्नाची मागणी सुद्धा घालायला येईन मी. पण तत्पूर्वी तुझ्या मनात माझ्या बद्दल जे काही भाव आहेत ते तू मला सांग. मला तुझ्या तोंडून ती ऐकायची आहेत. आणि घाई नाही पण परतायच्या आत मला कळव तसं.

त्या रात्री जवळपास १२;३० ते ०१:०० वाजून गेले होते. बारीक सारीक सगळी कामे संपवून घेतली होती. पण एक होतं वेळात वेळ काढून आज ती माझ्यासाठी जागीच होती. अंघोळीला गरम पाणी काढणे, तावेल टॉवेल वगैरे आणून देणे. जेव्हा सगळी माझी आवराआवर झाली मी झोपायला वर निघालो. मागोमाग ती पण येऊ लागली. अंथरुणावर आडवा लेटताना असं कितीतरी दा वाटायचं ती येणार, खुणेने तरी काहीतरी सांगणार. पण याच विचारात माझे डोळे केव्हा मिटले मला काही कळलंच नाही.

रात्री उशिरापर्यंत काम चाललं म्हणून मला उठवायला तसं कुणीच आलं नाही. पण सकाळच्या झारोख्याला पुसट पुसट आठवते. कुणी नाही असं कानोसा घेत.. कुणाच्यातरी दबक्या पावलांनी यावा असा आवाज येत होता. तिने अलगद माझ्या अंगवरली चादर काढली आणि क्षणभर माझा निद्राधीन असलेला चेहरा स्वतःच्या डोळ्यांत टिपून घेतला. हळुवार आपल्या ओठावरचे स्मित पसरवून माझ्या कपाळावर ओठांचे चक्षु उमटाविले. त्या तिच्या किसी मूळे मी स्वतःची कुस पलटवली आणि ती आली तशी निघून चालली गेली. आता ते भास होते की सत्य हे मला ठावूक नाही कारण तिच्या गेल्यानंतरही मी कितीतरी वेळ झोपूनच होतो. तरी मला उठायला १०:०९ वाजले असावेत.

उठल्यावर खाली कुणाला काय रूप दाखवणार म्हणून गच्चीवर तोंड वगैरे धुतले आणि अंघोळ करण्यासाठी खाली आलो. थोडफार फ्री झाल्यावर पान खाण्यासाठी म्हणून होटेलकडे रवाना झालो. तिच्यासाठी एक साधा पण घेतला आणि एक पण खात खात मी घराकडे आलो.

दुपारचं जेवण झाल्यानंतर मी तिला कित्येकदा बोलण्यासाठी प्रयत्न केला. पण जमेच ना. सतत कुणातरी अप्तांची नजर माझ्यावर रोखलेली असायची. आणि एकांत मिळणं म्हणजे भारी कठीण होतं. शेवटी हिम्मत करून मी घरात गेलो. ती एकटीच आत होती. मला बघताच्टी घाबरली. ती काही बोलणार नाही हे मला ठावूक होतं म्हणून मीच म्हटलं... भिऊ नको माधुरी, तू तुझं उत्तर तुझ्या समाधानाने दे , घाईत नको, मी फक्त हा पान देण्यासाठी तुला बघत होतो.

मला वाटते तिची आणि माझी ती शेवटची भेट असावी. कारण त्या दिवसापासून ती कधी भेटलीच नाही मला. कार्यक्रम जवळ आला. जबाबदाऱ्या वाढल्या. आणि त्यामुळे जे काही होत ते मनातच वाढत चाललं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच जायचं म्हणून रात्री जरा लवकरच आवराआवर खाली. सकाळी उठल्यावर फक्त दोनदा तिचा चेहरा बघायला मिळाला. तितकच जरा हायसे वाटले. एक म्हणजे चहा आणून देताना आणि दुसरं म्हणजे ताईला बोलवायला येताना. मी फक्त तिच्या उत्तराची अपेक्षा करत इकडे तिकडे फिरत होतो.

कार्यक्रमात धुमालीच्या नादात तिला नाचताना बघितलं. काय सुरेख नाचत होती. आजही तिचे ते व्हिडिओ रेकॉर्ड अजूनही माझ्या मोबाईलमध्ये असतील. पण खरतर त्याही दिवशी तिचं आणि माझं बोलणं झालच नाही. पण त्या दिवशी गावाकडे परतताना ती दिसलीच नाही.

मात्र गावात गेल्यावर जे माहीत झालं. ते ऐकून मला धक्काच बसला. कशाला आलोय इथे असं वाटायला लागलं होतं. कारण कार्यक्रमावरून माधुरी थेट स्वतःच्या गावाकडे निघून गेली होती. फक्त तिची आई इथे परत आली होती. ती माझ्यासाठी एक वैऱ्याची रात्र होती. कशीतरी ती रात्र मी तिथे काढली आणि कुणालाही काहीच न कळवता स्वतःच्या गावाकडे चालला आलो.

आज खूप दिवसांनी अचानक ताईने फोन केला. तेव्हा मला माहित झालं की तिचं लग्न जुळला आहे म्हणून... ताईच सांगू लागली.. लग्नाच्या कार्यक्रमात ती फार तडफडत होती रे तुला सांगण्यासाठी पण आप्तांच्या भीतीने ती काहीच बोलू शकली नाही. जेव्हा जेवण करायला आम्ही तिला घरी आणलं होतं. तेव्हाच मला सांगितलं तिने सगळं. फार इच्छा होती रे तिची तुझ्याशी बोलण्याची. हे सगळं मी तिच्या डोळ्यांत बघत होतो. पत्रिका ठेवलीय तिने तुझ्या नावाची. येणार असशील तर चल आम्हा बरोबर..

कोणताही उत्तर न देता मी फोन काटला तो कायमचाच.. कारण त्यांनतर मी कधी तिला बघितलेच नाही . ही अधुरी माझी प्रेमकथा शेवटी अधुरीच राहिली...

## ३) देऊळ कशासाठी...

मित्रांनो.. प्रेम, मैत्री, विरह अश्या भरपूर कथा आपण वाचलेल्या आहेत. पण ह्या लेखावर खरंच विचार करायला काही हरकत नाही. प्रत्येकाचे स्वतंत्र विचार करून जोपर्यंत काही निर्णय होत नसतो. लेख लिहिणाराला त्याचे सांत्वन कधीच होत नसते. चला तर मग शुरुवात करूया...

फार वर्षापूर्वी एक वृद्ध जोडपं स्वतःच्या अंतिम वेळी आपल्या नातेवाईकाला भेटायला निघाले. पूर्वी आजच्यासारखी वाहने नसल्या कारणाने दहा दहा पंधरा पंधरा दिवस नुसती पायपीट करावी लागायची. वाटेत बरीच गावे पडायची. त्यामुळे चालण्याचा थकवा घालवण्यासाठी कधी जंगलात तर कधी नदी काठावर अशी त्यांची स्वारी चालली होती.

दिवस मावळायला लागला होता. आणि त्यांना जिथे जायचे होते तो चार पाच मैलांचा प्रवास अजून बाकीच होता. शेवटी जवळपास त्यांना एक गाव दिसून आलं. त्यामुळे त्यांना थोडी आशा वाटली की येणारी रात्र कदाचित ती तिथे घालवू शकतील. शेवटी एक एक पाऊल कंठीत ती त्या गावात आले. तिथे त्यांच्या ओळखीचे असं कुणीच राहत नव्हते. रात्रीच्या फक्त विसाव्यासाठी त्यांनी कितीतरी घरांची दारे ठोठावली असतील. पण प्रत्येकांनी नाही, नको ते उत्तर देऊन त्यांना घालवून लावले. आणि शिवाय आता अंधारायला पण लागलं होतं. आणि या अंधारात हे ओझं धरून जायचं कुठे हा प्रश्न त्यांना पडत होता.

शेवटी हताश मनाने ती गावाची फेरफटका मारू लागले. न जाणे कुणीतरी त्यांची मदत करेल. पण दैव आड गेल्यागत कुणीच त्यांची मदत केली नाही. शेवटी गावाच्या जवळच काही अंतरावर त्यांना एक मंदिर दिसलं. आणि त्या मंदिरात आश्रयासाठी त्यांनी जागा निवडली. पण तिथंही लोकांनी त्यांना घालवून लावण्यासाठी काठोकाठ प्रयत्न केले.

भल्या सकाळीच गावातील मुख्ख्या आपले तीन ते चार सहचर धरून त्या मंदिरात आली. आणि पाठोपाठ गावातील काही प्रतिष्ठित मंडळी पण होती. त्यांनी या म्हाताऱ्याला तिथे राहण्याचा जाब विचारला...

तू कुणाला विचारून इथे विसावा घेतलास.. ही आमची मालमत्ता आहे.. सांग तुझी हिम्मत कशी झाली इथे थांबण्याची... मुख्या म्हणाला..

पण तितक्याच मृदू स्वरात म्हातारा म्हणाला... बाबा रे.. मला फक्त एकच गोष्ट सांग... देव तुझा की माझा?

म्हाताऱ्या हा काय प्रश्न आहे? देव सगळ्यांचाच. मग तुझा काय नि माझा काय? परत मुख्या म्हणाला...

मग म्हातारा म्हणाला.. जेव्हा तुम्ही आम्हाला आसरा दिलं नाही तर मग आम्ही जायचं कुठं? देवाची लेकरे देवाजवळ आलो.

म्हाताऱ्याच्या या उत्तरावर सगळे निरुत्तर झाले. आणि निघून गेले.

मित्रांनो ही एक सत्यकथा आहे. आपल्या पूर्वी जेव्हा मंदिरांची निर्मिती झाली. प्रत्येक गावांत ती यासाठी होती की बाहेरून आलेला प्रवाशी.. ज्याचा कुणी संबंधी त्या गावात नसायचा.. त्या वेळेस विश्रांतीसाठी तो त्या मंदिराच्या आवारात असायचा. श्रद्धा तर होतीच पण त्या श्रद्धेच्या मागे हे एक कारण होतं.

आजही काही प्रथा संपलेल्या नाहीत. ग्रामीण भागात लग्नासाठी आलेला नवरदेव आधी मंदिरातच जानुसा ठेवतो. नवरीला घरी आणण्या अगोदर मंदिरातूनच त्याची वाजत गाजत स्वारी निघते. अश्या कित्येक प्रथा मोडत चालल्या आणि त्यावर असणारे संस्कारही.

दारोदारी लाथाडत भीक मागण्या पेक्षा देवाचं नैवैद्य खावून जगणारी भिकारी पाहिले. पोट भरण्यासाठी बसस्टॉप, रेल्वे स्टेशन इथे हिंडताना आपण त्यांना बघतो. पण आपण काय करतो? पाय धरणाऱ्या त्या भिकाऱ्यांना लाथाडतो आणि शंभरच्या ऐवजी हजार रुपये दान पेटीत टाकतो. पण तेही एखाद्या भुकेल्याच्याच पोटात जातात. याचा विचार सुद्धा करीत नाही.

मुळात भिकारी कोण असतो. तोही आपल्या सारखाच एक सामान्य माणूस असतो. कुणाला सवय आहे पोटासाठी असं ताटकळत उभं राहायला. कुणी परिस्थितीने बनतो, कुणी मानसिक ताणतणावाने बनते, अशी बरीच कारणे आहेत. आजतागायत पांच घराची भिक्षा मागून पोट भरणे ही एक प्रथा अवगत आहे. पण कोण कुणाकडे बघेल? कुणाला वेळ तरी आहे का? या सगळ्यांवर बोलायला...

दैव तारी त्याला कोण मारी, ज्याचा कुणी नसतो त्याचा देव असतो.. मी नास्तिक तर नाही पण एक विचारते... देव आहे

. कुठे आहे?.. कुणाला दिसला?... कुणी बघितला?.. आणि जर बघितलाय तर त्याने काय मागितलं? स्वार्थ... तेही केवळ मर्यादित... स्वतःपुरता..

आज इतक्या पैश्याची राशी मंदिरांना मिळते.. घरापेक्षा शोभिवंत असा मंदिर बनतो.. मग देवाच्या देव्हाऱ्यातून असं सामान्य माणसाला का हाकलले जाते?आपण म्हणतो ना देव सगळ्यांचा.. मग ही सगळी अनाथ देवाच्या आसऱ्यात का नाही? श्रद्धेचा आज इतका मोठा बाजार झालाय की देव्हाऱ्यात देव बसवला जातो की कुबेर याचीसुद्धा जाण नसते. मंदिर आहे की सोण्या चांदीची दुकान हेसुद्धा उमगत नाही. पूर्वीच्या लोकांची समाधानासाठी काढलेली एक सोय होती की आता शेअर करायला दगडाचा एक नमुना आहे असं वाटतं.. काही चुकलंच तर देणे घेणे ..

## ४) मी एकटा...

कधी वाटले नव्हते ती मला अशी मिळेल... आयुष्यात एकदातरी.. तेव्हढ्याच वेळासाठी.. तरी येईल असं वाटलं नव्हतं.. काय मजा यायची.. जेव्हा ती सोबत असायची.. कित्येक चर्चा कित्येक स्थळांची आठवण यायची.. आजही आठवते हातात असलेला तिचा हात.. नजरेला नजर लावलेले तिचे डोळे.. आणि सोबत चाललेलं हितगुज.. एकमेकांच्या लग्नाच्या शपथा.. पारीवर घेतलेल्या आणाभाका.. तिच्यासोबत असताना अंतरा अंतरात असलेलं दडपण होतं.. पण ती एक दिवस जरी नसली तरी दिवस निघाल्या सारखं वाटत नव्हतं.. काय प्रेम होतं आमचं एकमेकांवर..

अचानक एके दिवशी ती निघून गेली.. डोळ्यात पाणी आणून तिची वाट बघितली.. पण ती आलीच नाही.. जाताना नेहमी येते म्हणतात.. पण ती जाते सुद्धा म्हणाली नव्हती.. तिच्या कित्येक गोष्टी आठवून मन रडत असायच.. इतक्या दिवसांच तिचं प्रेम खरं की खोटं.. काहीच कळत नव्हतं.. क्षणभर वाटलं.. तिचं जीव घ्यावं.. पण मी खरं प्रेम केलं होतं.. त्यामुळे तुला सर्वस्व अर्पण होतं.. पण तिने यावं.. माझं काय चुकलं? काय गुन्हा केला? का सोडून गेली ती? या सगळ्या प्रश्नाची उत्तरे द्यावी.. माझ्या प्रेमावर माझा विश्वास होता.. ती येईल असं वाटत होतं.. पण ती आलीच नाही.

झालंच काय होतं? .. अचानक तिच्या वडिलांची बदली झाली.. आणि मी पण बाहेर होतो.. आणि ती गेली ती शेवटचीच.. पण दुरावा कायमचाच.. नाही चिठ्ठी.. नाही कुणाकडे निरोप.. म्हणतात पाहिलं प्रेम आणि पहिली मिठी .. कधीच सुटत नाही.. पण ती गेल्यावर कधी परतलीच नाही.. आणि मी शोधलं तर कधी सापडली पण नाही.. माझ्या मनाला एकाच खंत होती.. की तिने यावं.. माझं प्रेम खरं होतं.. हे कबूल करावं..

दिवस जात होती.. आणि मी फक्त तिचीच वाट बघत होतो.. तिच्या वाट बघण्यात पण काय मजा होती.. तिच्या आठवणीत केव्हाच घर सोडलं.. नेहमी एकांतात जाऊन बसायचो.. गावाबाहेर जंगलात एक झोपडी होती.. मेन रोडच्या आसपास.. आता तेच माझं निवासस्थान

झालं होतं.. लोकांच्या वेडा म्हणण्यापेक्षा दूर एकांतात.. मी माझी खरी ओळख पटवण्याचा प्रयत्न करत होतो..

एका सायंकाळी अफाट वादळ आलं.. रस्त्यावर चालणेही मुश्किल होतं.. त्या वादळाने भक्कम झाडेही.. मुळापासून उखडून पळत सुटले होते.. त्या वादळात गाडीतून ती येत होती.. मी रस्त्यावरून हे सगळं बघत होतो.. अचानक एक झाड त्या गाडीवर येऊन पडले.. अंधाऱ्या रात्री जंगलात तिची विनवणी मला ऐकु आली.. मी जरा धावतच गेलो.. अंधारात चेहरा दिसत नव्हता.. त्याला उचललं आणि झोपडीत आणलं.. तो वेदनेने विव्हळत होता.. पण थोडे प्रथमोपचार.. त्याला बरं वाटायला लागलं होतं.. मेणबत्ती लावली आणि धन्यवाद देण्यासाठी.. तिचा तो उठला.. त्यावेळेस त्याची प्रथम भेट.. आणि त्याच मेणबत्तीच्या प्रकाश्यात तिची माझी नजरानजर...

हृदय स्थिरावले.. नजर सुखावली.. आणि ती परतली.. माझ्यासाठी नाही.. पण तरीही काय योगायोग?.. माझ्याजवळ.. त्यांना थोडीफार फराळाची सोय केली.. आणि बाहेर चालला आलो.. वादळ अजूनही शांत नव्हता.. विजांचा लखलखाट चालूच होता.. थोडीफार शांतता होती.. पण हृदय अजूनही धडधडत होतं.. त्याचं आवाज मात्र स्पष्टपणे येत होतं..

काही वेळानं ती पण आली.. आजही तिची चाहूल तशीच वाटायची.. मोग्र्याच्या सुगंधाने.. मधमाशी भुळावी.. त्या एकांतात.. आमचाही काही क्षणांचा एकांत होता... ती पहिली भेट नव्हती.. पण आजही तिची आणि माझी.. नजरानजर मात्र होत नव्हती.. सगळे शब्द संपल्यागत झाले होते.. मी इतका बधीर झालो होतो की.. तिचं थंक यू सुद्धा कानावर येत नव्हतं.. पण विचारलंच शेवटी..

का आलीस परत तू?.. नव्हतंच नाते वाढवायचे ना.. निदान सांगायचं तरी होतं.. अशी गम्मत करून जीवच घ्यायचं होतं ना.. शब्दानं जाती का सांगितलं असतं ना .. तरी जीव दान केला असता..

मी आली हे एक योगायोग आहे.. आणि करावं तरी काय? घरच्यांचा दबाव होता.. अचानक लग्नाची तारीख काढली . आणि मी पण हो केलं.. तुला निरोप दिला नाही.. कारण हे सगळं विसरायचं होतं.. पण जे झालं ते झालं.. तू ही हे सगळं विसरायचं होतं..

विसरायला मी तुझ्यासारखा स्वार्थी प्रेम केलं नव्हतं.. खरं प्रेम करत होतो.. म्हणून आज हे भोगत आहे.. माझं प्रेम तुला कळलं नाही.. तुला जे पाहिजे होतं.. ते तू मिलवलस.. आता मला जे पाहिजे.. ते की मिळवणार.. माझी शिक्षा मला नको मिळायला...

चूक झाली रे माझी.. मला माफ कर.. स्वतःच्या स्वार्थापोटी मी हे सगळं कबूल केलं.. तुला शब्दानही निरोप दिला नाही.. वाटलं होतं तू मला विसरशील.. खरंच मला तुझं प्रेम कळलं नाही.. पण आज कळलय.. हो तुझं प्रेम खरं होतं.. मीच चुकले.

तुझ्या या अवस्थेला मीच कारणीभूत आहे.. पण एक करशील.. माझं तू मला परत देशील..

कदाचित आता ते शक्य नाही ग.. खूप वेळ झाली आता.. माझं प्रेम संपलं आता.. आणि माझी वाटही.. कारण आता मला माझं.. उत्तरही मिळालं..

असा बोलत मी चालत राहिलो.. ती मात्र माझं नाव घेऊन ओरडत राहिली.

पण या वेळेस.. तिच्या चेहऱ्यावर.. मला माझं प्रेम दिसत होतं.. आणि मी वळून सांगणार.. तोच एक धक्का बसला.. ती मला मांडीवर डोकं घेऊन रडत बसली होती.. चालता चालता.. पडक्या खांबाचा धक्का लागून.. माझं शरीर केव्हाच अलग झालं होतं.. कळलंच नाही.. ती मात्र आता.. पश्चाताप करून रडत होती.. आणि मी परत चालू लागलो.. तिच्यापासून दूर ... तिच्याच जवळ.. तिच्या आठवणीत... एक अस्तित्व नसलेलं.. सत्य बनून.. मी एकटा .

## ५) मुक्ती...

आज तो खूप रागात होता. कसल्यातरी विचारात हरवून सतत इकडे तिकडे फेरफटका मारत होता. काय करावं आणि काय नको त्याला काहीच सुचत नव्हते? पण आज त्याला निर्णय घ्यायचाच होता. या सगळ्या गोष्टीतून त्याला मुक्ती पाहिजेच होती. काहीवेळ विचार केल्यावर त्याने एक थरारक निर्णय घेतला. मोबाईलच्या काही बटण चाळत त्याने मित्राला फोन केला. आणि त्याला बंदूक पाहिजे म्हणून सांगितले. मित्राने त्याला जिथे बंदूक मिळेल असा पत्ता दिला.

होते नव्हते ते सगळे पैसे घेऊन त्याने तिथे जमा केले आणि बंदूक कमरेला खोसून त्या भयानक गल्लीतून कोणाचीही पर्वा न करता सपासप पावले टाकत हायवेवर आला. मागून एक ऑटो येताना त्याला दिसली. त्याने हात दाखवला आणि ऑटो धरून स्वतःच्या रूमवर आला.

एकदा सगळ्या रुमला त्याने सभोवार बघितले. मग एका पुस्तकातून एक गुलाब आणि तिचा फोटो काढला. तिचा फोटो असा हातात धरून केविलवाण्या नजरेनं बघून मग क्रूरपणे हसू लागला. आणि पुन्हा लाडाने त्या फोटोचा मुका घेतला. एकवार त्या गुलाबाच्या फुलाकडे बघितले. कारण आजही ते त्याला तितकेच ताजेतवाने वाटत होते. मग हृदयावर दगड ठेवून आपल्या आणि तिच्या आठवणी जमा केल्या व डोळ्यात अश्रू ओघळ असताना सुद्धा रॉकेल टाकून त्या सगळ्या आठवणी खाक केल्या.

मग अंगात त्याने पांढऱ्या रंगाचा आपला आवडता शर्ट घातला. जो कधी काळी तिला खूप आवडायचा. आणि परत एकदा बंदूक कमरेला खोसुन घराबाहेर पडला. कारण आज त्याला पूर्णपणे खेळ संपवायचा होता. आणि असा ठाम निश्चय त्याने मनाशी केला होता.

पण आता एक विचार चालू होतं की यात त्याला मुक्ती कशी भेटणार. कारण शिवाय आता तिचे लग्नही झाले होते. तिचा अत्ता पत्ता पण याला ठावूक नव्हता. आणि गेली चार वर्षे तो हे दुःख सहन करीत होता. पण आता त्याला मुक्ती पाहिजे होती. तिच्या त्या प्रेम बंधनातून. जिने त्याची आत्मा स्वतःच्या श्वासात अडकवून ठेवली होती. ती त्याला सोडवायची होती. पण हे तितके सोपे नव्हते. कारण गेल्या चार वर्षांपासून तो तिच्या खूप दूर झाला होता.

चहाच्या कपातून माशी अलगद काढून घ्यावी त्याप्रमाणे तिने तिच्या जीवनातून अलगद काढून फेकून दिले होते. मग तिचा शोध तरी कसा घ्यावा हा एक मोठा प्रश्न त्याला पडला होता. त्याने पूर्ण शक्ती लावून तिचा पत्ता काढण्याचा प्रयत्न केला होता. पण नेहमी निराशाच हाती आली होती. शेवटी हताश होऊन तो आपला भूतकाळ आठवू लागला. तिच्या सोबत त्या सगळ्या आठवणी एक एक करून त्याच्या डोळ्यासमोर रुंजी घालू लागल्या होत्या.

रोहिणी... हो हेच नाव तिचे. सुंदर नाक नक्ष, सडपातळ बांधा. पण दिसायला अगदी मोहक अशी शरीराची रचना. आणि त्यात भर म्हणजे तिचे कमनीय डोळे. ज्याला एक नजर बघेल तो तिथेच घायाळ होऊन जाईलच समजा. बोलण्यात पण एकदम तरबेज, कधी गप्प नाही राहायची. एखाद्या लहान मुलाप्रमाणे तिची बोलायची सवय होती. आणि या सगळ्या गोष्टींमुळे समीर तिचा दिवाना झाला होता.

सचिनच्या म्हणजे त्याच्या मित्राच्या लग्नात त्याने तिला सर्वप्रथम पाहिले होते. तसं समीरसाठी मुलींचे आकर्षण म्हणजे काही नवीन नव्हते. पण यावेळेस काहीतरी वेगळं त्याला होवू लागलं होतं. ती एका खुर्चीवर पायावर पाय टाकून छान थाटात बसली होती. मान खाली टाकून समीरने जसा आत प्रवेश केला. तशीच दोघांची नजरानजर झाली. आणि त्याच क्षणी समीरचे हृदय धडधडू लागले. संपूर्ण लग्नात ते एकमेकांकडे ते असेच बघत होते. आणि मनातल्या मनात दोघे पण एकमेकांवर प्रेम करायला लागले होते.

शेवटच्या दिवशी जेव्हा ती जायला निघाली . तेव्हा जाताना तिने त्याला एक फ्लायींग किस देऊन आपले प्रेम व्यक्त केले. त्या दिवशी त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

कारण इतका खुश तो कधीच झाला नव्हता. मग एका मित्राकडून तिचा मोबाईल नंबर मिळाला आणि सुरू झालं त्यांचं प्रेमप्रवास. तो आणि ती एका गावातले जरी नसले तरी तिच्या एका आवाजावर तो शंभर किलोमीटर केव्हा पोहचत होता हेच त्याला कळत नव्हते.

मग गप्पा गोष्टी करता करतात केव्हा मर्यादेच्या पार चालले गेले त्यांचं त्यांनाच कळलं नाही पण ते अगदी त्यांत खुश होते आणि काही दिवसांनी ते लग्न पण करणार होते. एकंदरीत त्यांच्या प्रेमाचे सुखद संसारात परिवर्तन होणार होते. पण नियतीला काहीतरी वेगळेच करायचे होते.

का कोण जाणे रोहिणीने अचानक त्याला टाळणे चालू केले होते. आधी तर समीर ने त्या गोष्टीकडे पाहिजे तितके लक्ष दिले नाही. कारण त्याला माहित होते की घरच्या लोकांना त्यांच्या प्रेमाची चाहूल लागली होती. त्यामुळे त्यांची भेट आणि त्यांचे बोलणे थोडे मंदावले होते. आणि कदाचित यामुळे रोहिणी आपल्याशी बोलू शकत नाही असे समीर ला वाटत होते.

असेच काही दिवस निघून गेले. समीरला नेहमी मनात हुरहूर वाटायची की रोहिणी त्याला सोडून जायला बघत आहे. नक्की काही तरी संकट येणार आहे. याचा त्याला भास येत होता. पण तो स्वतःची समजूत काढत होता. छे काहीतरीच काय? मी ना कसलाही विचार करत असतो. माझी जानू मला कशाला सोडून जाणार. ती तर माझ्याशिवाय जगूच शकत नाही. आम्हाला कुणीच अलग करू शकत नाही. आमचं प्रेम अतूट आहे. असं सांत्वन करून टाकायचा नेहमी स्वतःला.

पण मला का बरं असं होत आहे. कारण याआधी तर असं कधी झालं नाही. एक काम करतो रोहिणीला फोन करतो.. म्हणजे सगळं ठीक होईल. मला पण थोडं बरं वाटेल. आज एक महिना झाला की तिला फोन नाही केला. खूप आठवण येत आहे तिची. त्याने आपल्या मोबाईल मध्ये तिचा नंबर डायल केला आणि कॉल केला. पण नंबर बिझी दाखवत होता. त्याला वाटले असेल कुणा तरी मैत्रिणी सोबत बोलत असणार. अर्ध्या तासाने त्याने पुन्हा ट्राय केला पण याही वेळेस तेच नुसतं बिझी.

याआधी असे कधीच झाले नव्हते. समीरचा नंबर पाहूनच ती सर्व सोडून तास न तास बोलायची पण आज तर ती त्याला इग्नोर करत होती. थोडा वेळ अजून वाट पाहत त्याने पुन्हा एकदा तिला कॉल केला पण ती नुसतं बिझी. आकाशात वीज कोसळल्या प्रमाणे समीरचे हृदय धडकले आणि त्याच्या अंतःकरणातून एकच आवाज आली. दगा झाला समीर ... दगा झाला...

त्याने तिला कॉल वर कॉल केले. खूप कॉल केले. शेवटी तिने कॉल उचलला. हॅलो म्हणताच त्याला थोडे नारे वाटले... समीर म्हणाला.. का ग इतकं वेळ कुणाशी बोलत होती. माझा कॉल बघून पण उचलत नाही..

कोणाचं सोबत तर नाही... आणि बोलली असेल तरी तुला काय प्रोब्लेम आहे... रोहिणी म्हणाली.. समीरसाठी हे उत्तर अनपेक्षित होते. त्याने कल्पनासुद्धा नव्हती केली होती की ती असं काही बोलेल.

तुला काय झाले.. तू असं का बरं बोलत आहे.. मी तर साधं विचारलं तुला.. समीर म्हणाला..

मला काही विचारू नको. मला खूप काम आहे बाय... असं म्हणून तिने फोन ठेवला.

तिच्या वागण्याने तो चांगलाच शॉक झाला. आता मात्र त्याला खात्री झाली आहे की नक्की काहीतरी गडबड आहे. त्याने तिला सरळ समोर विचारायचे ठरवले आणि दुसऱ्या दिवशी तिच्या गावाला गेला. तिला भेटायला. रस्त्यात एका झाडाखाली तो तिची वाट बघू लागला. अचानक ती समोर येताना दिसली. अचानक ती त्याला समोर पाहून थोडी घाबरली व नॉर्मल होण्याचा प्रयत्न करत होती. त्याने तिला सरळ विचारले

...

काय प्रोब्लेम आहे.. मो फोन करतो तर उचलत नाही.. धड बोलत नाही.. तुला काय झालं आहे.. का बरं अशी वागत आहेस.

माझी वाट सोड.. मला काही विचारू नको .... आता तुझा आणि माझा रस्ता वेगळा. यानंतर इथे यायचं नाही.. आणि मला कॉल सुद्धा करू नको... मला आता तुझ्याशी काही घेणं देणं नाही... रोहिणी म्हणाली..

समीरला तर विजेच्या धक्क्यापेक्षाही मोठा धक्का बसला.

का.... का .... बरं... झालं तरी काय? मी काय केलं? माझा गुन्हा तर सांग... असं नको करू? की तुझ्याशिवाय नाही जगू शकत.. समीर म्हणाला...

तर जाऊन कुठे जीव दे... पण मला त्रास देऊ नको... रोहिणी म्हणाली..

आकाशातील असंख्य विजा आपल्या अंगावर पडत आहे. असे समीरला वाटू लागले. त्याच्या पायाखालची जमीन सरकली आणि तो तिथेच बेशुद्ध पडला. आणि ती त्याची पर्वा न करता सरळ निघून गेली. समीर शुद्धीवर आला तर तो एका झाडाखाली होता. रस्त्याने येणारे जाणारे त्या कडे बघत होते. त्याचे कपडे मळले होते. तो उठला आणि चालायला लागला. एका निर्जन ठिकाणी जाऊन तो रात्रभर रडत राहिला. त्याला काहीच कळत नव्हते.

हे असे का बरं झालं होतं?त्याचा काय गुन्हा होता? रोहिणी का बरं अशी वागत होती? दुसऱ्या दिवशी पुन्हा तिला भेटण्याचा प्रयत्न केला पण परिणाम तोच. ती त्याच्या सावलीला पण आपल्या जवळ येऊ देत नव्हती. एक दिवस ते हद्दच झाली तिने त्याला सरळ पोलिसांच्या

ताब्यात दिले त्याला. त्यांनी त्याला बेद्दम मारहाण केली. आणि त्यांनतर ताकीद देऊन सोडून दिले.

हे सर्व समीरला असहनिय होते. तो आपल्या गावात परत आला पण आता त्याचे मान जाग्यावर नव्हते. तो दारू प्यायला लागला. दिवस रात्र फक्त तिचेच नाव जपू लागला. असेच दिवस लोटत गेले समीर स्वतःचे अस्तित्व सुद्धा विसरून गेला होता.

हळूहळू तो ते दुःख कमी करू लागला. आपल्या परिस्तिथी मध्ये तो बदल करू लागला. काही दिवसांनी त्याला कळले की तिने लग्न केले पण तो करणार तरी काय? शांत राहण्यातच त्याने आपली समजूत घातली पण मनात सारखं तिला आपल्या प्रश्नाचे उत्तर विचारायचं असच वाटत राहायच. तो जगत तर होता पण रोज मरु मरू. त्याला सारखं वाटायचं की ती त्याला एक दिवस जरूर भेटेल. ती येईल असे त्याला नेहमी वाटायचे. पण असेच वाट पाहत त्याने चार वर्षे काढली होती आणि आज त्याने तिला धडा शिकवण्यासाठी पाऊल उचलले होते.

जेव्हा त्याने डोळे उघडले. तर तो आजही त्याच मंदिरात उभा होता. समीरने त्या दोघांचे फोटो बघितले होते. म्हणून तो त्यांना ओळखू शकत होता. पण रोहिणीचा नवरा मात्र त्याला ओळखू शकत नव्हता. त्याला बघताच त्याने हात मागे केला. त्याने तिथेच त्याचा गेम करण्याचे ठरवले. हाच आपल्या प्रेमाचा वैरी आज याला संपवायचे आणि आपला बदला घ्यायचा. इतक्यात तो बंदूक काढणार ती त्याला बाहेरून येताना दिसली. तोच तो एका मनोऱ्याआड जाऊन लपला व स्वतःला लपवून घेतले.

थोड्या वेळाने ते दोघे बाहेर पडले आणि त्यांच्या मागोमाग तो पण लपत छपत त्यांच्या मागे गेला. ते एका घरामध्ये आतमध्ये प्रवेश केला. तेव्हा पुन्हा एक विचार त्याच्या मनात आला की जर मी तिच्या पतीला मारले तर मला मुक्ती नाही मिळणार. आणि या सगळ्यात त्याचा काय गुन्हा? तो पण तर माझ्याच सारखा तिच्या प्रेमात आंधळा असेल. त्याला मारून काय मिळणार? याउलट ते एक पापच होईल माझ्या हातून..

आणि माझ्या प्रश्नाचे उत्तर तर मला तिच्याकडून मिळेल. तर तिलाच पकडायच आणि विचारायचं. आणि नाही बोलली तर ठोकायच असं ठरवून तो वाट बघू लागला. काही वेळाने तिचा पती बाहेर पडला. आणि गाडी काढून कामावर गेला. ही समीर साठी सुवर्ण संधी होती. त्याने इकडे तिकडे पाहिलं.. कोणीच नव्हतं. त्याने बंदूक काढली आणि आतमध्ये प्रवेश केला. ती स्वयंपाक घरामध्ये काहीतरी करत होती. समीर ने निशाणा लावला आणि गोळी चालवणार इतक्यात त्याला एक युक्ती सुचली.

त्याने लपून तिच्या डोक्यावर प्रहार केला. ज्यामुळे ती बेशुद्ध पडली. आणि उचलून बाहेर उभ्या असलेल्या कारमध्ये तिला टाकले. मग घरात चाबी शोधली आणि गाडी काढून सरळ ती आपल्या जुनाट पडक्या घरी नेली.

काही वेळाने रोहिणीला शुद्ध आली. तर ती एका छोट्याश्या खोलीत जुनाट अश्या खुर्चीत स्वतःला बांधलेले बघितले. तिने हालचाल करून बघितले तर तिचे हात पाय सुटणार नाही याची तिला खात्री झाली. आणि समीर समोरच तिच्या पुढ्यात तिच्या शुद्धीवर येण्याची वाट बघत होता.

त्याला असं समोर बघताच तिची घाबरगुंडी उडाली होती. तिला दरदरून घाम फुटायला येत होता. आता आपल्या सोबत काय होणार? हा प्रश्न तिला पडला होता. तिला बघून समीरने एक क्रूरपणे हास्य केले आणि म्हणाला..

घाबरु नकोस मी तुझ्या सारखा निर्दयी नाही आहे. तुझ्या केसालाही धक्का लावणार नाही. पण तुला असं सोडणार पण नाही. कारण गेली चार वर्ष मी हेच विचार करत होतो की तू जेव्हा कधी मला भेटशील तुला माझ्या प्रश्नाचं उत्तर विचारायचं आहे. पण आज जेव्हा तू माझ्या समोर आहेस तर काही प्रश्नच उरले नाहीत. आता फक्त मला मुक्ती पाहिजे तुझ्या या खोट्या बंधनातून. कारण माझी मुक्ती तुझ्याच हातात आहे. आणि तेव्हाच तू इथून जाऊ शकशिल. आणि मला माझ्या सगळ्या प्रश्नाची उत्तरे पण मिळून जातील. तुला काही नाही करायचे.

फक्त तुझ्या समोर जी बंदूक ठेवली आहे. ती उचल आणि मला गोळ्या घाल. मोकळी हो इथून. आणि मला पण मोकळा करून टाक. मी आधीच आत्महत्येचा लेटर लिहून ठेवलंय. त्यामुळे तुला काहीही कोणत्याही गोष्टीचा त्रास होणार नाही. मला मारून ती बंदूक माझ्या हातात ठेवून इथून चालली जाशील. आणि हो... पण मारशील ना... तर काळजावर वार करशील. कारण माझा जीव तिथेच आहे. असं म्हणून समीरने तिचे बंधन सोडून तिला मुक्त केले.

आता रोहिणी उठून उभी झाली होती. आणि तिने विचार केला की जर मला इथून सुटका पाहिजे आहे तर समीरला मारावेच लागणार. आणि शिवाय त्याने तयारी पण पूर्णच केली आहे. तर मला काही प्रॉब्लेम पण होणार नाही. आणि कसलाही विचार न करता तिने बंदूक उचलली. समीर हे सगळं जाणून होतं. त्याने चेहऱ्यावर एक स्मित पसरवली आणि दोन्ही हात वाऱ्यावर पसरवले.

त्याच्याकडे फारसे लक्ष न देता रोहिणीने धाडकन एक गोळी समीरच्या हृदयात घातली. पुन्हा एक.... सलग दोन गोळ्यांचा आवाज कानाशी गुंजलेला होता. समीर खाली कोसळला पण अजूनही त्याच्या चेहऱ्यावर तेच हास्य होते.. गड जिंकल्याची.. अगदी शेवटचं तो अडखळत म्हणाला... रोहिणी... आज मला मुक्ती .. मिळाली.. पण तू कैद झालीस..

पण रोहिणीला बाहेर निघायचं होतं.. म्हणून तिने घाईने बंदूक समीरच्या हातात ठेवली आणि बाहेर निघू लागली. दरवाज्यात पाऊल ठेवताच तिच्या लक्षात आले. पाय उचलत नव्हते. अंतःकरण द्रवायला लागले होते. क्षणभरात तिची नजर निपचित पडलेल्या समीरकडे गेली. त्याचा मृतदेह स्वतःच्या मांडीवर घेतला... स्वतःच्या अश्रूंनी ती त्याचा अभिषेक करू लागली. आणि मी काय केलं म्हणून ओरडू लागली.

स्वतःचं प्रेम सिद्ध करण्यासाठी समीरने स्वतःच्या जिवाचासुद्धा त्याग केला होता. त्याने स्वतःच प्रेम अमर केलं होतं. आणि आता तो मुक्त झाला होता. सगळ्या अधिकारातून, साम्राज्यातून. पण जाताना त्याने मात्र रोहिणीला कैद केले होते.

स्वतःच्या केलेल्या कृत्याचा तिला पश्चाताप होऊ लागला होता. कारण त्याच्या प्रत्येक कारणाला रोहिणी कारणीभूत होती. आणि आता तर इतक्या कैदेत गेली होती की ती कुणाशीच बोलत नाही... माझ्याशी देखील नाही..

# ६) नकार

सकाळ सकाळी आज तिच्या मरणाची वार्ता ऐकुन फार वाईट वाटले. तशी ती माझी कुणीच नव्हती. पण दोन दिवसांची ओळख आणि तिच्या बाबतीत माझं एकच शब्द... बस इतकाच अंतर.. पण तरीही माझं मन स्वतःलाच कोसत होतं.. की कुठेतरी आपलीच चूक आहे.. तर वळूया स्वतःच्या गोष्टीकडे...

तसं यंदा माझा लग्न करण्याचा विचार नव्हता.. पण वय जसं वाढत चाललं. घरी तशी घाई होत चालली. ज्या माणसांकडे मी कामाला होतो. तो रोज शहरात जाऊन दूध द्यायचा. त्यानेच तो पत्ता आणला आणि घरीसुद्धा त्यानेच ती गोष्ट चालवली. दोन तीनदा टाळलं पण घरी सगळे सीरियस आहेत हे बघून विचार केला की बघायला काही हरकत नाही. शेवटी दोन वडीलधारी पकडले आणि दिवस ठरवून निघालो. तसं वडिलांना न्यायला पाहिजे होतं पण मी आधीच घरी सक्ती केली होती की मुलगी आधी मी बघणार आणि आवडली तरच गोष्ट चालवणार. सगळे राजी तर होतेच कारण त्याने इतकं चढवून सांगितले होते की घरचे मला बळीचा बकरा द्यायला तयारच होते. शिवाय माझं पहिल्यांदा मुलगी बघायला जाणे होतं.. म्हणून हृदय सुद्धा धडधड करीत होतं..

च्यायला मुलगी बघण्यासाठी सुद्धा मुलाला काय मुलीसारखं साजावं लागतं. ही नको ती पॅन्ट लाव... हा शर्ट छान दिसेल.. ही दाढी तेवढी करून घे.. जसं काय मुलगी बघायला नाही तर अब्राहम लींकनला भेटायला चाललोय. फायनली आधीच हृदयात धकधक चालूच होती. तिला बघताना काय बोलणार?.. काय विचारतील? खरंच ती मुलगी आपल्याला पसंद करेल काय? नसत्या शंका उद्भवत होत्या.

जवळपास तिच्या घरी जातपर्यंत तरी प्रश्नांचा भडिमार खूप होता. खरी गोष्ट तिच्याबद्दल जातानाच कळली. आईवडील नाहीत. दोन बहिणी आहेत. कपड्यांच्या मॉल मध्ये ही मॅनेजर आहे. आणि लहान बहीण शाळा शिकते. परिस्तिथी जरा बेताची आहे. पण आपल्याला काय? फक्त मुलगी चांगली हवी होती. सगळ्यांनी मला हे सांगून अचंब्यातच ठेवलं होतं. आणि तिचं

लग्नही म्हणे तो मॉलचा मालकच करणार आहे. काही वेळासाठी का असोना असं वाटत होतं की आपण विनाकारण इथे आलोय.

त्या मालकाने स्वतःच्याच घरी सगळी तय्यारी केली होती. फार छान अदबीने आमचं स्वागत केलं होतं. बसायला सोफा, कुलर वगैरे चालू करून माझ्याकडून हवी ती माहिती काढून घेतली. जीवनात मी पहिल्यांदा इतका verified झालो होतो. भाऊबंद नजरेच्या खुणेने मला वारंवार डिवचत होते. वारंवार नजर त्या दरवाजावर जात होती. तिला बघायची घाई आता आक्रंदत चालली होती. नाश्ता झाल्यानंतर थोडावेळ मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या आणि शेवटी मुलीला आणायची तयारी चालू झाली.

शेवटी मुलगी आली आणि माझ्या पुढ्यात खुर्ची टाकून बसली. खरं सांगायचं म्हणजे माझी नजरच तिच्याकडे जात नव्हती. तसंही आमच्यात कुणी बुजुर्ग तर नव्हतच. म्हणून तिच्या मालकाने जे काही विचारायचे आहे ते मलाच विचारायला सांगितले.

मनावर दडपण ठेवून हळूच डोळे वर केले. कारण आत्तापर्यंत मी फक्त तिच्या पायापर्यंतच बघत होतो. हळूच डोळे वर केले आणि क्षणभर तिला न्याहाळला. सडपातळ बांधा, माझ्यापेक्षाही उंच होती, सगळं काही ठीक वाटलं, फक्त नाकाची उंची जरा जास्त वाटली. आणि उन्हाची झळ तिच्या चेहऱ्यावर असल्यामुळे चेहरा थोडा पुसट झाला होता. परिस्तिथीने खचलेल्याची जाणीव तिची शरीरयष्टी करून देत होती. तिला विचारलेला पहिलाच प्रश्न.. तुमचं पूर्ण नाव काय?जरा अडखडताच विचारलं. कारण आमच्याकडे विचारपूस फक्त आप्त बुजुर्ग करतात. आपल्याकडे फक्त होकार किंवा नकार असतो.

आवाज फार नाजूक वाटला तिचा पण त्यानंतर तिच्या परिस्तिथीशी लढते युद्ध मला तिच्या डोळ्यामधून दिसून येत होतं. त्यानंतर वय, शिक्षण, मामकुर हे सगळं विचारलं आणि मग माझा निर्णयच बदलला. ती चक्क माझ्यापेक्षाही वयाने मोठी होती. आणि तेही चार ते पाच वर्षांनी. हे सगळं घरी चाललं नसतं. म्हणून मी मग निरोप द्यायचं ठरवलं. पण हे सगळं मी

स्पष्टपणे बोलू शकलो नसतो. म्हणून सर्वस्वी निर्णय माझे आप्त देतील असा निर्णय करून वेळ टाळून दिली.

त्या दिवसांत मी तीन चारदा त्या मॉलच्या समोरून गेलो. तिची पसंती मी तिच्या चेहऱ्यावर साफ बघत होतो. मी तिला नकार ती माझ्यापेक्षाही चार ते पाच वर्षांनी मोठी असल्यामुळे देत होतो. पण तिच्या चांगुलपणावर मी खुश होतो. भलेही तिची परिस्थिती फार नाजूक होती. पण तिची मनस्थिती तेव्हढीच सबळ होती. तिला नकार देणे माझ्या जीवावर आलं असतं म्हणून परत सगळे आप्त मिळून बैठक घेतली. आणि वडिलांनी योग्य तो निर्णय दिला.

तिथून आल्यावर तिसऱ्याच दिवशी असं कळलं की शिंक आल्यामुळे तिच्या डोक्यावर काहीतरी परिणाम झाले आणि त्यामुळेच ती मरण पावली. आता याचं कारण तर काही समजलं नाही. पण स्वतःच्या स्वार्थासाठी मी तिचं घेतलेलं बळी तर नाही असं वाटत होतं. माझ्या आयुष्यात ही पहिली मुलगी होती जिला मी बघायला गेलो होतो आणि तिला नकार दिला होता. आणि ही खंत सदा माझ्या मनाला लागून राहील. आणि हो... ही काही काल्पनिक प्रसंग नाही तर कुणाच्यातरी आयुष्यात घडलेलं एक सत्य प्रकरण आहे... यावरून एकच कळते मला की .... नकार... माहीत नाही हा शब्द कुणी बनवला आहे ते.. पण नकार द्यायला फार वाईट वाटते..

## ७) प्रेमवाद

छेडल्या तारा, छेदल्या भावना..

मी तुझी, मी तुझी, तुझी रे साजना...

अचानक फोनचा आवाज तीव्र गतीने अचानक खिशात वाजत होता. स्पेशली तिच्या नंबरवर सेट केलेली रिंगटोन... आवाज येताच मी ओळखलं की साजनीने आठवण काढलीय.. आणि पटकन फोन उचलला..

हॅलो जानू..

हॅलो जान..

आज की नाही घरी थोडेसे भांडण झाले..

भांडण... कशासाठी ग..

अरे अंघोळ करताना ना, तुझी फोटो मी बाजूला फळीवर काढून ठेवली होती. घाईघाईत तयारी करून कॉलेजमध्ये आले. नंतर लक्षात आलं की तुझी फोटो बाथरूम मध्येच राहिली. कारण तुझी फोटो मी कधीच माझ्यापासून दूर नाही ठेवत ना..

सो स्वीट.. मग समोर काय झालं? माझ्या सासरची मंडळी काही बोलली काय?

सांगते ना... आधी विचारलं.. मग मी ना नुकुर केलं. पण आईने दिली कानशिलात ठेवून. मला रडूच आलं. मी काही सांगितलं नाही पण त्यांनी ओळखलेच. आता आपल्याला फारच जपून राहावे लागेल.

ते मला माहित नाही, तुझी चुक तू सुधार. मला जे पाहिजे ते मिळायलाच हवं. कारण दरवेळी तुझे हे बहाणे ठरलेलेच असतात.

बरं ऐक ना.. सायंकाळी निवांत बोलू ना. आई बाबा बाहेरच झोपतात. मीच आत असते टीव्ही बघत. ओके बाय जानू.. लव यू टू..

ओके बाय लव यू टू..

आता प्रसंग विस्कटले आहे. आणि धोक्याची घंटा लवकरच वाजणार आहे हे निश्चित होतं. दोन दिवस भेटणं टाळायचं हेच विचार करत होतो. पण त्यातून काही निष्पन्न होणार नाही याचीही खात्री होती. काय तो विचार सायंकाळी घेऊ म्हणून मी तिच्या फोनची वाट बघत बसलो..

रात्री आठ वाजता तिचा फोन आला. मी तीच्यच आठवणीत बुडलो होतो.

हॅलो जानू काय करत आहेस?

तुझाच विचार करत होतो स्वीट हार्ट!!!

कष्याबद्दल??

मी काय म्हणत होतो... आपण थोडे दिवस थांबुयात का? घरचे शांत झाल्यावर बघू.. तसं पण तुझं शेवटचं वर्ष आहे ना कॉलेजचं. मग दिवाळीत तर आपल्याला लग्नच करायचे आहे.

तू म्हणशील तर आत्ताही यायला तयार आहे. पण माझं जीव घ्यायचं असेल तर थंबुयात..

अशी काय बोलतेस तू?

मग काय? मी राहू शकते काय तुझ्याविना???

अग राहू मी पण शकत नाही. पण आपण एक होईपर्यंत असलं काही वादळ उठायला नको??

नाही उठणार. माझे आई वडील आहेत. मी सांभाळून घेईन त्यांना. फार तर काय? मारतील आणि घरात कोंबतील.. पण तुला त्याची चिंता करायची काही गरज नाही.. पळून येईन मी तुझ्यासाठी..

हे असं कसं बोलू शकतेस तू? मला आवडणार आहे का असं?

मग मला आवडणार आहे का तसं???

हे बघ वाद नको करू.. गुडघ्यात अक्कल असल्यासारखी.. जरा शांतपणे विचार कर.. काहीतरी मार्ग नक्कीच सापडेल!!

मी केलंय विचार, पण तुझंच काही ठरत नाही.. तू भित्रा आहेस.

ए अग ऐक... माझं ऐकुन तरी घे!!!

मला नाही ऐकायचं.. मी फोन ठेवते.. आणि कॉल कट झाला.. मी नुसतं हॅलो हॅलो करत बसलो.

सलग दहा ते पंधरा वेळा फोन केल्यावर शेवटी तिने फोन उचलला..

एकदा सांगितलं ना मला नाही बोलायचं तुझ्याशी!!

खरंच... बघ बरं.. मी परत फोन लावणार नाही...

हो... आणि तिने फोन कापला..

तिचं फायनल झाल्यावर मी फोन काही केला नाही. कसली हट्टी मुलगी आहे हा विचार करून गच्चीत लोळत पडलो. जवळपास रात्री साडेदहा वाजता तिचा फोन आला..

ह...

मला काही सांगायचंय. उद्या कॉलेज सुटल्यावर तू तुझ्या सगळ्या वस्तू घेऊन जा. मला नाही जमणार तुझ्यासोबत राहायला..

मी काय बोलणार.. कारण मुलीचा राग हा नाकावरच असतो हे ठावुकच आहे.. ठीक आहे म्हटलं..

तुला काहीच वाटत नाही का?? मी फक्त इतकंच ऐकलं आणि मीच फोन कापून टाकला.

तिला काय वाटले कुणास ठावूक परत रात्री साडेबारा वाजता तिचा फोन आला.

उद्या लक्षात आहे ना.. शेवटचं भेटायचं आहे ते..

हो लक्षात आहे.. आणखी काही सांगायचं आहे का?

काही नाही.. मघाशी काही तरी म्हणत होतास ना?

आता काही गरज नाही त्याची.. उद्या फायनल बोलून टाकू..

ए... ऐक ना.. मी थोडी रागात होते रे..

रागात... जसं काही मला रागच नाही येत..

प्लीज.... आणि मी परत फोन कापला...

रात्री परत दीड वाजला असेल तर तिचा फोन आला.

शांततेत फक्त फुस्फुसत रडण्याचा आवाज येत होता...

आता काय झालं?

(रडवेल्या स्वरांत) तुला काय माझा इतका राग येतो का रे? मी थोडीशी रागाने काय बोलले, तर तू मला फायनल करतोस. इतकी काय मी वाईट आहे का रे? मी मारून जाईन रे एक दिवस. प्लीज मला असं सोडून जाऊ नकोस. माझं जीव की प्राण आहेस तू.. जर का तूच मला असा सोडून गेलास तर मी का जगायचं..

अग वेडी आहेस का तु? एकतर बोलण्याच भान नसते, समजून पण काही घेत नाही. वाजलेत बघ किती? उद्या भेटायचं म्हणत आहेस ना.. मग पुन्हा का अशी वारंवार फोन करते आहेस?

नाही.. आधी सांग.. तू मला सोडून कधीही जाणार नाहीस. नेहमी माझ्याच बरोबर असशील..

अग हो बाबा.. नाही जाणार तुला सोडून.. ( मनोमन अब आया उंट पहाड के नीचे म्हणत. )आता जरा शांत हो.. अश्रू पुसुन टाक.. आणि गुमान झोपी जा.. रात्र खूप झालीय..

ओके बाय जानू गुड नाईट..

बाय गुड नाईट..

आत्ताशी कुठे ती जाग्यावर आली म्हणून खुश होतो. पण थोडक्यात मीही तिला घबरावलच होतं. त्यामुळे तीही न झोपता विचाराच्या नदीत वाहातच होती. पुन्हा तिला चैन आलं नसेल. जवळपास तीन वाजताच्या आसपास तिचा परत फोन आला. थोड्याशा रागानेच मी फोन उचलला..

आता काय झालं? लिहून देऊ का?स्टॅम्प पेपरवर...

तसं काही नाही, मला थोडी भीती वाटत आहे..

तुला... आणि भीती.. कश्याबद्दल?

तू रागात काही निर्णय घेत नाहीस ना..

निर्णय म्हणजे..

तू फक्त समजुतीसाठी मला सांत्वन करत नाहीस ना.. तसं असेल तर आत्ताच सांग.. कुणीच माझ्या जवळ नाही.. मी आत्ताच जीव देते...

अग वेडाबाई.. तू का अशी वेड्यासारखी वागत आहेस? तुझा माझ्यावर विश्वास नाही काय?

विश्वास आहे म्हणून तर तुझ्याशी बोलते आहे. पण तू माझी शप्पथ घेऊन सांग, तू मला कधी सोडणार नाही ते..

घे.... तुझी शपथ घेऊन सांगते.. की कधीच तुला सोडून जाणार नाही.. निदान आता तरी खुश... हॅप्पी..

पण उद्या ये भेटायला, थांबुया आपण काही दिवस. पण शेवटचं मला तुला डोळे भरून पहायचं आहे.

अग काय उद्या उद्या लावलं आहेस. तासाभरात दिवस उजाडेल आणि तू उद्या म्हणत आहेस!!!

अरे हो.. सॉरी बरं का..

सॉरी... अख्ख्या झोपेचं खोबरं केलंस आज.. बावळट कुठली..

काय करू यार.. तुला सोडून जगण्याची कल्पनाच असह्य होते.

बरं मघाशी म्हणत होतीस की माझ्यासारख्या भित्र्या माणसाबरोबर तुला राहणे आवडत नाही.

सॉरी न यार..

आता सॉरी... मग पाहिले कशाला झक मारी..

कारण तूने आंख मारी.. आता हसण्याचा आवाज दोघांच्याही मनात पूर्ववत झालं होता.

ए उद्या माझ्यासाठी एक गुलाबाचे फुल आणशील ना..

अग तूच इतका मोठा गुलाब आहेस, त्यात तो गुलाब काय करणार...

अस्स.. चल आता ठेवते.. कामे पडली आहेत..

आधी एक किस दे .. मग ठेव..

अ... ह... आत्ता खोटं नाही.. मग खरंच देणार.. बरं बाय लव यू टू..

ओके बाय लव यू टू..

प्रेमात असेही काही क्षण असतात. ज्यात वाद तर असतेच, पण ते वादही त्या प्रेमाचंच एक भाग असते. या वादात कुणी सावरतात, तर कुणी पेटतात, काहीजण तर खंडित सुद्धा होऊन जातात. पण आपल्या प्रेमाला कसं सावरायचं हे आपल्याच हाती असतं. चला तर मग आज प्रेम वादात कोण कोण जिंकतात ते बघुया...

## ८) बदला..

माझं गाव तसं आजही फार मोठं नाही. अगदी एखाद्या पाखराच्या घरट्यासारखे आमचे गाव आहे. आणि मी म्हणजे ज्याच्या त्याच्या तोंडावर आलेले सहज नाव. दिवसभर हिंडणे हेच माझं काम. कधी कुणा मुलासोबत विटी दांडू खेळायचे नाहीतर आबाच्या पडक्या घरात लप्पी छुप्पी. खरं सांगायचं म्हणजे अख्खं गाव माझ्या नावाने त्रासून गेलं होतं. आई तर नेहमी माझ्या नावाने त्रासून गेली होती. आधी रामा रामा करत थोड्या लाडाने जवळ बोलवायची. मग वळ येईपर्यंत धपाटे द्यायची.

गावात रिकामा असणे हे सगळ्यांना जरी चांगले वाटत असले तरी आई वडिलांना फार वाईट वाटायचे. कारण माझ्याच्याने कोणतेच काम जमत नसे. कारण आधीपासूनच माझं मन कोणत्याच कामात रमत नसे. आणि आज तर चक्क गम्मतच केली. गणप्या गावड्याचे बैली सोडून दिले होते. त्यामुळे घरी नको ती शोकसभा भरलेलीच होती. प्रत्येकाच्या तोंडचा शिव्या माझ्यासाठी काही नवीन नव्हत्या पण त्यादिवशी आईवडीलाच मात्र अंतःकरण फार प्रमाणात द्रवलं होतं. त्यामुळे सगळे गेल्यावर त्या दिवशी त्यांनी मला काहीच म्हटलं नाही. त्यादिवशी मी पण घराच्या बाहेर गेलोच नव्हतो. पण म्हणतात ना शांत वातावरण कधीही वादळ येण्याचं प्रतीक असतं.. आणि नेमके तेच झालं.

रातच्याला गेलेले बाबा अगदी सकाळी सकाळीच प्रहरीला आले. कारण माझं जगणं अगदी त्यांच्या नाकावर आलं होतं म्हणून त्यांनी मला बोलावले आणि म्हटले.. रामा तुझ्या अश्या वागण्यामुळे आम्ही फार त्रसलोय रे.. कारण खूप वाट बघितली तुझी पण तू सुधारायचा नाव नाही घेतलास. आणि जोपर्यंत मी तुला कोणत्या मार्गावर नाही सोडणार तोपर्यंत तू कधीच शिकणार नाहीस. आजपासून मी तुला ठाकूर साहेबांच्या वाड्यात चाकरीसाठी ठेवत आहे. दोन दिवसांनी तुला निघायचं आहे. तुझं काय आहे ते ठराव आता. कारण आता माझा निर्णय बदलणार नाही.

जे सगळं ऐकुन अगोदरच माझी पाचावर धारण झाली होती. कारण वाड्यांचा इतिहास मी फार काही प्रमाणात ऐकलं होतं. बुजुर्ग मंडळींची तोंडून मी पैश्याच्या राशीवर भुजंग बसतो हे कितीतरी वेळा ऐकलं होतं. जायची तर तयारी नव्हतीच माझी. आणि थोडं आदळ आपट पण करून बघितलं होतं पण त्यामुळे माझीच पाठ सोलल्या गेली.

शेवटी निर्णय झालाच आहे तर मग मी इवलंसं तोंड करून जायला निघालो. आईने घरून निघताना कसं वागायचं म्हणून यादीच वाचून दाखवली होती. शेवटी सगळ्यांचं आशीर्वाद घेऊन मी आपल्या प्रवासाला निघालो. रेल्वेत बसेपर्यंत बाबांनी मला साथ दिली. आणि शेवटचं त्यांना पाठमोरा बघत मी खिडकीतून बघत राहिलो.

छोट्या डब्याची ती न्यारोगेज रेल्वे आणि तिचं पटल तर बस... असं संगीत ऐकत असताना मला थोडी फार मजा यायची. आणि तिचं सगळ्यात हळू प्रवास, चोरी करणारा माणूस लुटमार करून गाडीतून उतरला तरी त्याला काही इजा होणार नाही.

ज्या वाड्यात बाबांनी मला ठेवलं होतं. त्याचा मालक अभयसेन ठाकूर. आमच्या गावातच काय तर अख्ख्या जिल्ह्यात त्याचीच दहशत. जिल्ह्यांत गावागावांत गाजलेला आणि नावाजलेला ठाकूर. हजारो माणसे त्याच्या हाताखाली, किती आली आणि किती गेली त्यांचं काही हिशोब नाही. व्याजाने पैसे द्यायचे आणि परतफेड नाही झाली की जमीन किंवा शेत झाली त्याच्या मालकीची. जणू कितीतरी दिवस त्याची दहशत अशी लागून होती. आता मला काही तेव्हढ माहीत नाही पण तो जेव्हा मरण पावला तेव्हा सगळीकडे त्याच्या दहशतीचे वातावरण कमी झाले होते.

पण एक गोष्ट होती आणि ती म्हणजे त्याची पत्नी. म्हणतात अभयसेण ठाकूर जितका क्रूर आणि कपट होता. तितकच त्याची पत्नी स्वभावाने सुंदर होती. सगळे प्रेमाने तिला माईच म्हणत. हल्ली काही विशिष्ट कारणामुळे तिची तब्ब्येत फार नाजूक असते असं कळलं.

रेल्वेतून उतरल्यावर थोडी विश्रांती घेतली. आणि रस्ता पकडला. तेव्हा जवळपास कुठे जायचं असलं तर टांगेच असायचे. पण पैसे वाचवण्याचा नाद करत मी भरपूर चालत आलो. ज्यामुळे माझे पाय फार दुखायला लागले होते. शेवटी कसतरी धापा टाकत मी गावात प्रवेश केला आणि पारावर बसलेल्या एकाला विचारले.. ठाकरे साहेबांचा वाडा कुठे आहे? त्याने समोर दरवाजाजवळ बोट दाखवला.

वाडा तसा जुनाट होता. कारण त्याचा अगदी प्रवेशद्वारच माझ्या घारायेवढा होता. आणि इतका विशाल होता की एक बाजू खोलयला फक्त तीन माणसे नेमली असायची. आणि त्याच द्वाराला एक छोटंसं द्वार होतं. जिथून नेमकं एक माणूस जाईल इतकं. मी द्वारापाशी गेल्यावर एकाने विचारलं... काय रे काय काम आहे?

मी शिवपुरीहून आलोय... चाकरिसाठी.. माईनेच ठेवलंय मला चाकरीला ..

बरं बरं ये म्हणत त्याने मला आत खिंचले आणि दरवाजा लावला. तो काहीतरी पुटपुटला आणि दोन स्त्रियांनी मला आत नेलं...

थेट एका छोट्याशा खोलीत घेऊन गेल्या. एका स्त्रीने मला जेवणाचा ताट करून आणला. आधी जेवण कर आणि आराम कर, मग आम्ही सांगू तुला काय काम करायचं ते. आणि हो आम्ही येईपर्यंत या खोलीच्या बाहेर पडता कामा नये. कळलं... मी होकार देताच दान दान पाय आपटत त्या निघून चालल्या गेल्या.

बाहेरून वाडा जसा दिसत होता. आतमधून तसा फार विशाल होता. कुणी हरवून जाईल असा. मी कुठून कुठे आलो तेच कळेना. सुरुवातीला भव्य पटांगण होतं. आणि मग एखाद्या राजाने राजवाडा बसवावा इतका विशाल तो वाडा होता. जिकडे तिकडे अत्यंत बारीक नक्षीकाम केलेल्या लादण्या होत्या. पण या सगळ्या राजवाड्यात मला काही अजब गोष्टी दिसल्या होत्या. त्या म्हणजे जागोजागी निंबु मिरची बांधलेली असायची. प्रत्येक दरवाज्यावर

लाल कापडात मंत्रून बांधलेला नारळ, आणि ती कसला कसला उदबत्तीच्या धुराचा उग्र दर्प. पण विचारावं कुणाला???

कशाला आलोय या नरकात?असं काहीतरी विचार करत असताना आत्ताच गेलेल्या त्या दोन स्त्रिया आल्या. त्यातली एक म्हणाली.. चल तुला माईने बोलावलंय.. आणि मी त्यांच्या मागोमाग चालू लागलो.

त्या जिकडे चालत होत्या. त्यांच्या मागोमाग मी जाऊ लागलो. शेवटी तिसऱ्या मजल्यावर खूप मोठं दालन आलं. सभोवार नजर टाकली मी. सगळ्या खिडक्या बंद होत्या. जिकडे तिकडे बघावा उग्र असा दर्प सुटला होता. कांदा आणि लसूण जिथे तिथे तोरणासारखे लावले होते. आजूबाजूला समया लावल्या होत्या. आत पडद्यांनी घेरलेल्या पलंगावर माई झोपली होती.

एका स्त्रीने तिला हाक मारली. माई बघ तो मुलगा आला. आणि तिनं तसं म्हटल्या क्षणी त्या पडद्यातून एक आकृती उठली आणि पडदे बाजूला करून मला स्वतःच्या जवळ बोलावलं. तिच्या कृश झालेल्या चेहऱ्यावर दरदरून घाम फुटत होता. दोन स्त्रिया तिच्या सेवेशी होत्या. आणि त्या तो घाम पुसण्याचा व तिला आधार देण्याचा प्रयत्न करीत होत्या. एखादं भयानक स्वप्न बघितल्यावर जे भय माणसात उरते ते तिच्या चेहऱ्यावर साफ ओसंडत होतं. प्रत्येक शब्द बोलताना तीचा उर धापापत होता. आणि कन्हण्याचा आवाज जेमतेम तेव्हढा चालू होता. ती पुरेल तेव्हढ्याच शब्दांत बोलली..

तूच का रे शिवपुरीचा..

हो.. माई..

काय काम करशील रे..

.... अ.... तुम्ही सांगाल ती करेन सगळी..

छान मुलगा आहे... जा ग ... त्याला सगळं काही समजावून सांगा..

हो माई म्हणत त्यांनी मला परत आणलं. मी जाताना हळूच मागे बघितलं तर..... तर तो आलाय.... तो तिथे दिसतोय... मला न्यायला आलाय.... असं बडबडत माई पडद्याआड झाली. मला त्या गोष्टीचे फार विचित्र वाटले. पण कुणालाही मी काहीही विचारू नये अशी सक्ती त्या स्त्रियांनी मला आधीच देऊ केली होती.

खाली आल्यावर त्यांनी मला काय काम करायचं हे समजावून सांगितले... रोज सकाळी उठून पाणी भरणे, आवार साफ करणे आणि इतर वाड्यातली सांगितलेली काम करायची. कुणालाच कशाबद्दल विचारायचे नाही. गुपचूप काम करायचे आणि गुपचूप राहायचं. मी होकारार्थी मान हलवली.

खरतर मला माई बद्दल जाणून घ्यायचं होतं. ती कोण आला म्हणत होती? ती का तशी वागते? इथे जागोजागी निंबू, मिरची, अगरबत्ती इतक्या प्रमाणात का आहेत. जिथे तिथे लसणाची माळ का टांगली आहे. हे सगळं मला जाणून घ्यायचं होतं. अशा कितीतरी गोष्टी मनात धरून मी मुकाट्याने कामे करीत राहिलो. असं करता दोन ते तीन महिन्याचा कालावधी उलटून गेला. मी आता सगळ्यांना ओळखीचा झालो होतो.

पण माई मला आजही एक प्रश्नचिन्हच होती. कारण इतक्या दिवसांत मी बघत होतो की माईची तब्येत दिवसेंदिवस अजुनच खालावत चालली होती. आणि इतक्या दिवसांत मी कधीच त्या खोलीच्या बाहेर येताना बघितलं नव्हतं. तिच्या अंघोळीपासून ते तिच्या जेवणापर्यंत सगळं काही वर तिथंच व्हायचं. आणि वर मला काही विचारायची पण बंदी होती.

त्या दिवशी अंगणभर पालापाचोळा पडला होता. त्या स्त्रिया ओरडतील म्हणून मी घाईघाईने झाडायला शुरुवात केली. बाजूला असलेल्या बदामाच्या झाडाखाली एक वृद्ध बसून होता. त्याच्या अशक्त शरीराकडे बघितल्यावर असं वाटत पण नव्हते की तो त्याच्या पायावर उभं राहू शकेल म्हणून. मला वाटलं कुणी इथलाच असेल वाड्यातील. म्हणून मी त्याच्याकडे काही लक्ष दिला नाही. त्यानेही मला काहीच प्रतिसाद दिला नाही. पण जोपर्यंत मी आवार साफ केला त्याची ती केविलवाणी दिसणारी विचित्र नजर माझ्यावरच होती. मला थोडं घाबरायला वाटत होतं. म्हणून घाईनेच आवार साफ केलं आणि आत जावयास निघालो. पण पालटून जेव्हा मी त्याच्याकडे नजर टाकली. तेव्हा ती गृहस्थ तिथे नव्हता.

आतमध्ये आल्यावर मी खोलीत जाऊन विचार करू लागलो. त्या स्त्रियापैकी एकिचं नाव होतं लक्ष्मीबाई. आणि फक्त मी तिच्याशीच बोलू शकत होतो. आणि नेमकी तीच तेव्हढ्यात आत आली होती म्हणून मग मीच तिला विचारलं..

बाई तुला एक विचारू का?

काय रे ... काय झालं?... विचार..

इथे कुणी वृद्ध गृहस्थ काम करतात काय?

नाही.. असं तर इथे कुणीच नाही . तुला कोण दिसलं?

बाई आज आवार झाडताना मला बदामाच्या झाडाखाली एक वृद्ध म्हातारा दिसला. फार थकलेला होता तो. माझं झाडून होईपर्यंत तो एकटक माझ्याकडे बघत होता. आणि मग इकडे

येताना पालटून बघितलं तर नव्हतं. मला वाटलं वाड्यातलाच कुणी असावं. कारण प्रवेश द्वारातून कुणी येऊ देत नाही. पहारेकरी रखवालदार असतातच.

तरी बया... म्हणूनच माई सकाळी सकाळी... आकांडतांडव करत होती..

बाई कोण तो माणूस? आज तरी सांगशील का मला.. ( मी जरा मागेच लागलो. )

सांगतो ... सगळं सांगतो... कारण मलाही दोनदा दिसला होता तो.. पण कुणाला सांगू नको..

नाही सांगत... सांगा तुम्ही..

आम्ही जेव्हा इथे कामाला नवीनच आलो होतो तेव्हाचीच ही घटना. तेव्हा तो इतका मोठा प्रवेशद्वार नव्हता. कुणी केव्हाही यायचे. त्या दिवशी माई आणि आम्ही इथे खालीच चव्हास्टा ( विदर्भातला अतिप्राचीन खेळ) खेळत होतो. तेव्हढ्यात एक गृहस्थ आला. आणि त्या बदामाच्या झाडाखाली येऊन बसला. तो इतका थकला होता की चालुही शकत नव्हता. तो जेव्हा बोलायचा तेव्हा त्याची छाती भरून यायची, आवाजात घोगरेपणा येत होता. तो माईला म्हणत होता.

माई खूप दुरून आलोय.. आता माझ्यात थोडसही चालायचं त्रान राहिलं नाही माई.. या गरिबावर दया कर.. तुला पुण्य लाभेल.. मला थोडं जेवायला दे माई.. मी तुझ्या पाया पडतो..

तो इतका कृश होता की त्याची हाडेसुद्धा मोजता येईल. पण तरीही माईने त्याची परीक्षा घेण्याचे ठरविले.. पुण्य.. पुण्याला काय चाटू व्हय... या पोटासाठी किती राबव लागतंय हे तुझ्यासारख्या भिकाऱ्याला काय कळणार... आणि तुला फुकट जेवण द्यायला ही काय

धर्मशाळा होय व्हय... हे आवार बघ... पाचोळ्यांनी कसं पसरलंय.. हे झाडण्याच आधी काम कर.. मग तुला जेवण देतो...

धड तो जागेवरून उठू पण शकत नव्हता. नुसतं मान वळवून इकडे तिकडे बघायचा आणि सगळं शिन लावून बोलायचा.... माई... पाय पडतो ग तुझ्या... कामही करतो... पण आधी मला जेवायला दे माई... तुझे फार उपकार होतील..

पण माई सुद्धा तेव्हढ्याच रागाने म्हणाली.. उपकाराची भाषा मला नको शिकवू भिकारड्या.. आधी काम कर.. मग जेवण मिळेल..

शेवटी भुकेच्या आहारी तो कसाबसा उठला आणि हातात झाडू घेतली. कसतरी झाडू मारू लागला. पण त्याच्यात त्राण उरलेच होते तरी कुठे? कितीतरी वेळा तो पडत जाई. पण पडता पडता झाडू मारत जाई. पत्या त्याची ती केविलवाणी नजर माई ओळखू शकली नाही.

तो कसतरी काम करत होता अनिएे फक्त त्याच्यावर हसत होती. जणू त्याचं काम करणं एक खेळ वाटत होतं. वर आम्ही त्याची मदत कराव म्हणून जेव्हा त्याच्यापाशी जात होतो तेव्हा तेही माईला पाहवत नव्हते. आणि वर बोलायची आमची इतकी हिम्मत पण नव्हती.

शेवटी होती नव्हती त्याची सगळी शक्ती संपली. आणि जेव्हा त्याला वाटू लागलं की आता त्याचा शेवट जवळ आला आहे. ते बघून हसणाऱ्या माईला तो म्हणाला..

माई.. आज तू मारलस मला.. पण ज्या जेवणासाठी तू माझं छळ केलीस... तसच छळ तुझं पण होणार माई.. आज ज्या परिस्थितीत मी इथे मरतोय ना माई.. कालांतराने तू ही अशीच मरशील माई.. मी येणार माई.. तुला न्यायला येणार.. आणि असं म्हणताच एक जोरदार किंकाळी त्याने फोडली.. त्याच्या नाकातोंडातून रक्त शिंपडल्या गेले. आणि ती तिथेच गतप्राण

झाला. त्या दिवसापासून हल्ली तो माईला दिसतो. आणि यामुळेच माईंची ही अवस्था आहे. पण मागील काही दिवसांपासून तो सगळ्यांनाच दिसतो आहे. अगदी स्पष्ट..

बाई बोलतच होती. आणि तितक्यातच माईंची एक जोरदार किंकाळी ऐकु आली. आम्ही सगळे धावतच माईच्या दालनात गेलो. तर बघून एक आश्चर्याचा धक्काच बसला. त्याही वेळेस माईला पाहून भीती वाटायला लागली होती. लक्ष्मीबाईंनी सांगितल्यानुसार तिचा शव अगदी त्या म्हाताऱ्यासारखा कृश झाला होता. आणि तिनेही नाकातोंडातून रक्ताचा पसारा ओकला होता.

खरं सांगायचं म्हणजे त्याने त्याचा बदला पूर्ण केला होता. अगदी बोलल्याप्रमाणे तो तिला घेऊन गेला होता. मी हे सगळं अनुभवल्यानंतर गावाकडे परतलो. जे बघितलं त्यावर विश्वास ठेवायचा की नाही ते माहीत नाही पण मी आता सुधारायचा प्रयत्न केला आहे...

## ९) सहवासाचे वेड

आज मी एक गावठी आहे. हो एक गावठीच. कारण मी एक अशिक्षित . आपले रोजचे काय? जंगलात जाऊन राधेला दोन गवताच्या पेंड्या आणायच्या. थोड्याशा खांद्यावर काटक्या आणि जंगलातील औषधी ज्यामुळे इतरांवर उपचार करता येइल. जे एका खेड्यात होते तेच इथे पण होते पण फरक पडतोच ना. मी नागभिड शहरापासून दूर एका जंगलात... एका छोटयाश्या पंधरावीस घराच्या टोळीत राहणारा मी एक साधा माणूस... हिम्मत इतकीच की तो सर्व भय विसरून केव्हा पण जंगलात जातो...

तो दिवस विसरायचं नाही. कारण तीची भेट मला त्यादिवशीच झाली होती. मी जास्त शिकलो नसलो तरी जीवनात आपल्याला काय महत्वाचं असतं आणि काय नाही हे चांगलं ठावूक होत. मृगाच पाणी पडण्याची शक्यता होती कारण ढगांनी आज सकळपासूनच आकाशात गर्दी केली होती. गावात जास्त रहदारी नव्हती त्यामुळं जास्त करून पायपीट करतच जावं लागतं होत. कुण्या एका मंत्र्याची नजर पडली आणि त्याने गावच्या वेशिवरून एक बस सुविधा उपलब्ध करून दिली.

त्या दिवशी जंगलात जायचा विचार तर नव्हताच, पण गावच्या सरपंचला खोकल्याची उबळ येत होती म्हणून जाणं भाग पडलं होत. आणि आमच्यात कसं असत की प्रत्येक घरचा माणूस हा आपला घरचा सदस्य मानला जातो. म्हणून दोन भाकरी आणि वाडग्यात पाणी धरुन मी निघालो.

इकडे वनौषधींचा शोध घेत सगळ रान वन एक करत जात होतो. उन्हाच्या तपामुळे काही वनस्पती जळून खाक झाल्या होत्या. त्यामुळे मला जरा खोलवर जावं लागलं. कुठे वाघाची डरकाळी तर कुठे अस्वलाच धुसफूस, तर कुठे अजगराच सरपटने. त्यामुळे थोड जपुन चलाव लागतं होत. शेवटी खूप शोधल्यानंतर हवी ती वनस्पती भेटली. पण आता

दिवसही गेल्यागत झाला होता. उन्हाची तिरीप हळू हळू खाली उतरत होती. सायंकाळच्या प्रहरेला शुरुवात झाली होती. त्यामुळे रात्र आता जंगलातच काढावी लागेल म्हणून एखादं उंच झाड बघत होतो.

आकाशात आता ढगांच साम्राज्य जरा वाढलं होतं. मेघनाद चालू झाला होता. अधुन मधून एखादी विज हृदयाची स्पंदन वाढवून जायची. पाऊस आता कोणत्याही क्षणी बरसणार होता. त्यामुळे मी रात्र काढण्यासाठी एखाद्या चांगल्या जागेची सोय करत होतो.

अचानक पावसाची थेंब पडू लागली आणि आजू बाजूला सळ सळ च संगीत तयार झालं होत. पण त्या आवाजात मला कुण्याच्या तरी ओरडण्याचा आवाज येत होता. इतक्यात कोण असु शकते म्हणून त्या आवाजाच्या दिशेनं जाऊ लागलो. आता पाऊसही जरा वाढला होता. त्यामुळे दूरचा परिसर स्वच्छ दिसत नव्हता पण मात्र ओरडण्याचा आवाज मात्र स्पष्ट येत होता. मी जरा जोरानेच ओरडलो... कोण हाय तिकडं... गुमान सामोरी येतो की नाही... की काढू कुऱ्हाड...

अचानक कुणीतरी धावत येवून मला बिलगल. क्षणभर अस वाटल की हे काही भुताच तर प्रकार नाही, कुणी चेटकीण तर नाही ना, म्हणून कुऱ्हाड घट्ट पकडून सरळ धरली. कारण गावात अश्या कित्येक गोष्टी ऐकल्या होत्या. आणि कित्येक लोकांनी ते पहिलं पण होत. पण माझा अजून भुतांवर विश्र्वास नव्हता.

मी तिचे दोन्ही खांदे पकडून तिला अलगद बघितलं. तिच्या हृदयाची धडधड मला स्पष्टपणे जाणवत होती. जेव्हा तिची खात्री झाली मी तिला बाजूला सारल. मला बघून तिला थोड सावरायला आल.

ती एक तरुण मुलगी होती. तिचे हरिणी सारखे डोळे, भितीने घाबरलेली नजर, घामाने ओले चिंब झालेले तिचे चिकटलेले केस, कपाळाला आठया आणत पसरलेल्या चेहऱ्यावर कुठे

कुठे कटक्यांचे वळ, हातात बॅग आणि डोक्यावर गॉगल कोणी तरी हिरोईन वाटत होती. जणू जंगलात एक चांदणी चमकण्यास आली. क्षणाक्षणाला तिला दरदरून घाम फुटत होता. आणि ती घाबरून जात होती. हे सगळं याची प्रचिती देत होते की ती फार दुरुन आली होती आणि वाटेत कुणी प्रवाशी न भेटल्या मुळे घाबरून धावत राहिली होती.

माझ्या कडे वाडग्यात थोड पाणी होत. ते मी तिला आधी पाजलं आणि थोडी विश्रांती घ्यायला लावली. कारण आता सूर्य अस्तास जायला निघाला होता. आणि राहायला उंच जागेची सोय करायची होती. कारण जमिनीवर राहणे तेहि जंगलात धोक्याचे होते. जंगली प्राण्याचा तसेच इतर गोष्टीचा त्रास होतो म्हणून मी ती जागा शोधत होतो.

माझ्या मागे मागे ती पण होती. ती थोडी घाबरलेली होती म्हणुन मी काही विचारपुस करायचा प्रयत्न केला नाही. फक्त तिला इशारा केला. काही अंतरावरच शिकाऱ्यांनी उंच झाडावर बांधुन असलेल्या खोपटी नजरेस आल्या. ते बघून थोडा धीर आला मी तिला इशाऱ्याने वर चढण्यासाठी सांगितल. वर चढण्यासाठी एक लाकडी चालवू शिडी बनविली होती. तिला वर चढण्यासाठी भीती वाटत होती पण मी तिला माझ्या छातीवर हात ठोठावत मी तूझ्या पाठीशी आहे असा इशारा केला.

हळू हळू ति वर चढत होती. मी खालून तिच्या वर नजर ठेवत होतो जेणेकरून ती वर सुखरुप चढावी म्हणून. थोडी वर गेल्यावर ती खाली वाकून बघू लागली. आपण किती उंचावर आलो आहे ते बघितल्यावर ती जास्तच घाबरायला लागली.

अचानक तीचा पाय घासरल्या गत झाला. आणि तिचा हात वरच्या दंडाला धरून ती लटकली. तोच ते पाहून मी लगबगीने वर चढलो. आणि तिच्या पायाला आधार देवून नीट वरच्या पायरीवर चढवला व मग तिच्या मागोमाग तिच्या कंबरेला पकडुन तिला वर चढवल. आयुष्यात प्रथमच मी एका स्त्रीला स्पर्श केला होता तिच्या कंबरेला हात लावताना एक वेगळीच हुडहुडी अंगात जाणवली. पण ते वेळ नव्हती. त्यामुळं मी फक्त माझे कर्तव्य जे होते ते केले. शेवटी आम्ही वर मचानावर पहोचलो. ती एका बाजूला आणि मी जवळच एका बाजुला विसावा घेण्यासाठी पडलो.

तिच्याबद्दल मनात वाटू लागले. कोण ही? इथे कशाला आली असेल? एक नजर तिच्यावर टाकली. डोळ्यातले अश्रु गालावर येवून सुकले होते. पण किती शांतीने ती झाडावर झोपली होती. तिचा निर्मळ चेहरा याची साक्ष देत होता. आणि मी तिच्यात हरवून जात होतो. तिचा विचार करत करत केव्हा झोपी गेलो माहितच नाही पडले.

जितक्या अचानक झोपी गेलो तितक्याच वेगाने माझी झोप कसल्या तरी आभाशी वास्तव्याने उघडली. तिच्याकडे नजर गेली ती घाबरून माझ्याकडे येण्याचा प्रयत्न करत होती. जवळच एक भलामोठा अजगर फुस्कळत होता. मगाशी जळवून ठेवलेली मशाल मंद झाली होती. ती घाबरून माझ्या पाठी मागे आली आणि माझ्या खांद्याला हात पकडून उभी राहली. तिचा तो स्पर्श अंगात एक नवीन बळ देवून गेला. मी मशालीला पुन्हा पेटवण्यासाठी तिला कपडा गुंडाळुन तिला सुळगॅण्यचा प्रयत्न करत होतो. तोच अजगरला आमची चाहूल लागली. तो आतापर्यंत वर नव्हता आला पण त्याने आता तिकडे कुच केली होती. फड फड फांद्या तोडत तो वर येत होता.

पण तितक्यात त्या मुलीने कशाचा तरी स्प्रे त्या मशालिवर टाकला आणि तिच्या कडे असलेल्या लायटर ने ते पेटवले हे बघून मी थोडा अवाक झालो. थोडा वेळ आधी जी मुलगी खूप घाबरत होती तिच्या या साहसाने आश्चर्य वाटले. फार वेळाने कळले की विज्ञान कुठे नाही पहोचले आहे. त्यासमोर तर हे खूप छोटी गोष्ट होती. कडकड फांद्या मोडत होत्या आणि मी त्या मशालीने अजगराला हुसकावून लावण्यासाठी बघत होतो. पण तेही अजगर थोडा खाली जायचा पुन्हा वर यायचा. तसं दिवस उजाडायला अजून वेळ होता पण त्यानं ठरवलं होतं की भूक भागवायची. मग मीही ठरवला होता की मी असे पर्यंत याला वर येवू द्यायचे नाही. न जाणे ही झुंज किती वेळ चालली पण मशालीचे खूप चटके त्याला नक्की बसले होते. शेवटी हताश होवुन तो माघार घेवून परत जंगलात निघून गेला. आणि जीवात जीव आला.

एकटा असतो तर मला या सगळ्या गोष्टीची कधी भीती नसती वाटली. आलेल्या प्रसंगांना तोंड देण्याची युक्ती आणि शक्ती माझ्यात होती. पण सोबत ती असल्या कारणाने बाब अजून

टळली नव्हती. कारण हे जंगल होत इथे दिसण्या पेक्षा असण्याला महत्त्व असते. मग ते कुठेच असो. रात्रीच्या त्या प्रकारामुळे कुणाचीच झोप बरोबर झाली नाही. आणि भीती तिच्या मनात साफ दिसून येत होती. अखेर सूर्य थोडा वर आला आणि आजूबाजूला पाखराची कुजबुज सुरू झाली. शिवाय तहान पण लागली होती त्यामुळे आता आम्हाला खाली उतरावे लागणार होते.

तिला घेवुन आसपास कुठे झरा आहे का ते बघण्यासाठी फिरू लागलो. समोर ओलसर मातीवर रानटी केळीच झाड होत त्यातल्या काही केळी काढल्या. आणि जवळच एक झरा होता तिथे जावून पाणी पिवून तृप्त झालो. जवळच एक खडकावर थोडक्यात सुटल्याचा उसासा घेत मी विसावा टाकला. तिच्या कडे नजर टाकली तर ती एकटक माझ्याकडेच बघत होती. मला ही छान वाटतं होते पण ती भेटल्या पासून आम्ही काहीच बोललो नव्हतो. झऱ्यातील पाण्याने तिने हातपाय धुवून चेहरा ताजा तवाना केला होता.

त्यानंतर मी तिला आपल्या घरी घेवुन आलो. घरी विज नसल्यामुळे अंधार होता. मला कधी गरज पडली नाही पण तिला मात्र तिथे थोडी भीती वाटली. मी तिला म्हंटल की तु थोडा आराम कर मी सरपंच कडून येतो. पण ती म्हणाली मी पण सोबत येतो नाही तर तुम्ही पण इथच थांबा... मला भीती वाटते. मी म्हणलं इथेच घर आहे की.. इकनाल गेलं नी तिकनाल आल. पण ती कशाला ऐकते.. आलीच मागोमाग.

सरपंच म्हणजे गावचा मुख्य माणूस. शासनाने नाही तर गावकऱ्यांनी त्याला ही पदवी दिली होती. शिवाय गावात तोच एक शिकलेला होता. आणि दूरसंचार करण्या साठी त्याच्या कडेच जावे लागते. म्हणून औषधी च्या बहाण्या ने जावे त्या कडे आणि तीच्या परतीचा प्रयत्न करावा असे ठरवून जेवण केल्यावर निघालो. पण आदिवासी सगळे काळे मी पण काळा आणि ही पांढरी पोर आश्चर्य होतं त्या रात्रीचे. कारण घरून निघताना सरपंचाच्या कानावर हवेसरखी बातमी पसरली होती की, कोणी तरी माझ्या घरी आलेय वर सगळेच तिला इतके जवळून बघायचे की ती आश्चर्य वाटत होती जणू.

इतकं सगळं घडत असल्यावर सरपंच कशाला थांबेल घरात. स्वारी बाहेरच लाकडावर बसून तयार. काय ते मोबाईलचे बटन पिळत. शाळा भरल्यासारखे सगळ गाव जमा झाले होते. आणि सगळे लोक आमच्या भोवताल तिच्या बद्दल सगळ्यांना आपुलकी जाणवु लागली. सरपंचाने तिला त्याच्या घरी थांबण्यास सांगितले. ती तयार होईना पण तिच्या डोक्यात एक युक्ती सुचली.

सरपंचाच्या मोबाईल वरून तिने आपल्या सरांना फोन केला आणि मग तिच्या बद्दल सगळ्यांना माहीत झाले. तिने त्यांना तिथली माहिती दिली होती. शिवाय घ्यायला पण बोलावून घेतले. तिचे सगळं बोलुन झाल्यावर तिच्या चेहऱ्यावर जी खुशी होती ती बघून माझा पण आनंद गगनात मावेनासा झाला होता.

घरी गेल्यावर एकमेकांशी बोलण्यात तथ्य नाही हे लक्षात आलं होतं. आणि माझ्या मनात तिच्या बद्दल असलेली आवड मी तिला कळवू पण शकत नव्हतो. खाली बांबूचा टेबल त्यावर गवताच्या पेंढ्या आणि त्यावर कपडे हेच आमचे निद्रासन. पण ती घरी ज्या गादीवर झोपत असेल तशी गादी नव्हतीच. तिला झोपायला सांगितलं आणि मी बसलो बाहेर शेकोटी पेटवत. कारण रात्रीच्या पावसाने थंडी वाजत होती. आणि ती रात्र तिच्या सोबतची अंतिम रात्र होती म्हणून मला काही झोप लागणार नव्हती. आणि ती जाणार हे माहीत होतं. राहण्यासाठी तर ती आली नव्हती. आणि तीन जावं अस वाटत पण नव्हतं.

मध्यरात्र झाली होती. मी एक नजर तिच्यावर टाकली. कोमल निरागस, निर्मळ चेहरा निद्रेच्या स्वाधीन होता. डोळ्यावर आलेले केस परी सारखे वाटत होते. अस वाटत होत की जावं तिच्या जवळ आणि हलकेच हात तिच्या केसावरून फिरवावा.

रात्रीच्या अंधारात माझ्या घरी जणु काजवा चमकत होता. मध्य रात्रीच्या सुमारास जंगलातील किती तरी जनावरे माझ्या घराजवळ येवून ओरडत होती. आणि माझे घर हे थोडं जंगलात असल्याने ते जणु माझ्या घरातच ओरडत आहे असे वाटायचे.

मध्य रात्रीच्या शांत वातावरणात सुईचां सुद्धा आवाज ऐकण्यालायक असतो. आणि कुणी ओरडला तर दहा मैलांवर हाक जावी इतकी शांतता असते. आणि त्याच कल्पनेने मी इथे जागा होतो. अचानक वाघाच्या डरकाळी ने तीची झोप उघडली. आणि ती उठून बसली. भितीने गाळण उडाली होती. तिने आपल्या जवळपास बघितलं तिला कोणी दिसले नाही. मग तीच बाहेर शेकोटी पेटवली होती त्या दिशेने बाहेर आली. तिने मला बघितलं आणि ती पण तिथेच बसली.

झोप का नाही घेतली मला तिने विचारलं? जागरण करणे बरोबर नाही. किती प्रेमळ हा तीचा पहिलाच प्रश्न विचारला होता तिने मला. आता तिला काय सांगणार आहे? मी तर तिच्या साठीच जागरण करत आहे. थंडगार हवेत शेकावं की बोलावं सुचत नव्हतं. मी तिला झोप म्हटलं तर मला काही झोप लागणार नाही म्हणाली.

सहज म्हंटले मग सांगा तुमच्या बद्दल काही?? वेळ खूप होता आणि मनोरंजन म्हणून काही होते नाही ... माया मती असल्या पोरी जाम चालु असतात. याला पण हो म्हणत्यात आणि त्याला पण. आणि घेवुन पळतात भलत्याला असं सरपंच सांगत होता. मी आपले मन मोकळे केले पण तिला राग आला असावा. शेकोटीतील काड्या सावरत ती म्हणाली.

मुलीला सुंदर व आकर्षक असलेला मुलगा नको तर तिला आवडतो तीची काळजी घेणारा. एक बायको म्हणून नाही तर एक मैत्रिण म्हणुन वागावणारा. पण तुला यातल काही कळणार नाही आणि समजणार पण नाही.

आता माझेच घ्या लहानपणीच आई वडील वारले. काकांनी मालमत्तेवर कब्जा केला मला अनाथालयात टाकले. एक अनाथ म्हणून कितीतरी जनाची माझ्यावर नजर होती. पण मी कोणालाच वश झाली नाही. कार्य करण्याची क्षमता आली आणि मी अनाथालय सोडलं. पण जिद्द नाही. काम करून शिक्षण पूर्ण केले. आता मनासारखं कुणी तरी बघायचं आणि संसार निभवायचा. कितीतरी जनाची मागणी मी फेटाळून लावली. कारण प्रत्येकाचा चेहराच सांगतो की तो कोणत्या थराला जाऊ शकतो. ही सहल माझी शेवटची होती. यानंतर पुढच्या

महिन्यापासून मी चालली माझ्या नोकरीवर. पण एक तु आठवणीत राहशील. कारण आज मी आहे ते तुझ्यामुळे. तु म्हणजे माझ्या आयष्यातील महत्वाचा ठोकळा आहे. thanks a very lot I love you...

मला ते काय बी समजल नाही? काय ठोकळा ? काय लव ? ती आता काय बोलेल तिला राग तर आलाच. पण ती इतकी छान हसली की तिचे सुंदर रूप त्यात अजून खुलून दिसले. आणि ती अशीच हसत राहावी अस मला वाटतं होत.

सकाळच्या प्रहरी हवेत मला वाटलं पूर्ण मन मोकळं करून टाकावं. तिला म्हंटल एक ईचारू काय ?ती मानेनेच हो म्हणाली . तु खुप गोड हसते, दिसती पण चांगली , जगात कोणी बी तूझ्या परीस भेटणं चांगलं , जिवाचं झेंडू फुलल . माझ्या बोलण्यावर नगा जाऊ म्या काय बोलतू ते समजुन घ्या फकस्त. माझ्या प्रत्येक बोलण्यावर ती आढेवेढे करून ती ऐकत होती. कारण तिच्या बाबतीत मी पहिल्यांदाच स्पष्ट पण अडखळत बोललो होतो. जणु कोणी माझी चोरी पकडल्या गत.

माझं मन तीन जाणल. माझ्या गावठी शब्दातून तिन जे समजायचं ते समजुन घेतलं. सकाळच्या प्रहरी आणखी काही गमती झाल्या आणि दिवस कसा उजळुन निघाला कळलेच नाही.

आंघोळ करायला आम्हाला नदीवरच जावे लागणार होते कारण माझ्या घरी बाथरूम नावाचे असे काही साधन नव्हते. मग काय द्या पहारा खडकाआड.

मी ज्या खडका आड उभा होतो त्याच्याच मागे दुसऱ्या बाजूला तिने आपले वरील वस्त्र काढत असल्याची कुजबुज मला स्पष्ट जाणवत होती. वासनेतील पहिली झलक त्या खड्काआड होती. ती आंघोळी साठी पाण्यात गेली आणि इकडे क्षणा क्षणाला वाकून बघावे

असे सतत मनाला वाटत होते. कदचित लपून तीच नग्न शरीर बघणं तिला माहित होणार नसलं तरीही ते माझ्या आत्म्याला मान्य नव्हते.

पण मग राहवलं नाही आणि मी वाकून बघणार तोच तीच्या

कीचाळण्याचा आवाज कानी आला. आणि मी काही विचार न करता धावत तिच्या कडे सुटलो. ती पाण्यात च पाय पकडुन ओरडत होती आता काय करावे ते सुचेना. मी पाण्यात उतरून खाली तिच्या पायाला हात लावला आणि जे हातात आले ते पाहून सुटकेचा निःश्वास टाकला. तो एक छोटा खेकडा होता जो तिला चावला होता. इतक्याने बरे होते की तो विषारी नव्हता. मी म्हणलं घाबरू नका काही होत नाही फक्त थोडा दुखेल मग ठीक होइल. पण या सगळ्या मध्ये मी हे विसरून गेलो होतो की जे मला पाहायचे होते ते नकळत माझ्या समोर होते.

तिला ही ते लक्षात आले पण तिने कसलीही प्रतिक्रिया न देता मान खाली घालून बाहेर निघाली. मी पण तिच्या मागे मान खाली टाकून बाहेर निघालो. आता फक्त तिच्या गोऱ्या गोमत्या शरीराकडे माझे लक्ष होते. मनातल्या मनात त्या खेकड्या चे खूप आभार मानले. अस वाटत होत की त्याची देवळात ठेवून पूजा करावं ज्याने मला तिचे ते रूप बघण्यासाठी मदत केली. ती कापडे घालत असताना सुद्धा मी नजर वर करून पहायची हिम्मत नाही झाली माझी. ती मात्र माझ्या कडेचं पाहत आहे असे मला जाणवत होते.

विरहाच्या दुःखाने थोडा मुक्यानेच फराळ होत होता तीन जावं असं मला वाटतं नव्हत. दोघं पण आम्ही आपल्याच तालात होतो. कुणीच बोलत नव्हते पण नजरा मात्र दोघांच्या पण बोलत होत्या. त्या पण मिळवणे कठीण होत होते. कारण येतो कीवा जातो म्हणणे कदाचित तिच्या पण जीवावर आलं असत. आणि होवु शकते तीची पण जायची ईच्छा नसेल.

शेवटी पूर्ण तयारी झाली आणि आम्ही वाट पहात बसलो. तोच तिला न्यायला गाडी येवुन थांबली. आपल्या परिचितांना पाहून तिला आनंद झाला. पण एक खंत तिला वाटत होती ते मला सोडून जायची. तिने एका कागदावर आपला पत्ता लिहिला आणि मला दिला. आय लव

यू म्हणत घट्ट मिठी मारली. पण निघताना तिने मागे वळुन पाहीले नाही. कदाचित यामुळे की तिचे अश्रू दिसतील याचे तिला भय होते.

मला कधी तिच्या कडे जायचे तर नव्हते पण तिने मारलेल्या त्या मिठीत आणि घेतलेल्या मुक्याने इतका विसरून गेलो की ती गेली तरीही तीचा स्पर्श हा होतच होता. आणि अख्खं आयुष्य जगायला हा तीचा स्पर्श खुप होता . ती आली आणि निघुन गेली पण तिचा सहवास अजुनही माझ्या बरोबरच होता . आणि जाताना ती येते म्हणाली होती. आता वाट बघेन तीची कारण कळत न कळत ती मला प्रेमाचा अर्थ सांगुन गेली होती.

## १०) शेवटची भेट...

ब्रेकअप झाल्यानंतर आज कितीतरी दिवसांनी मला तिला भेटायचा योग आला. तसा हा योग असा योगायोग तर नव्हताच. पण कुणीतरी कुणासाठी तरी आवर्जून काढलेली वेळ तरी नक्की होती. तर मूळ प्रसंगाकडे वळूया.

इतरांसारखे माझेही प्रेम अगदी सुरळीत चालले होते. कधी अबोल तर कधी बडबड, कधी रुसवा तर कधी फुगवा, कधी वाद तर कधी विनोद, कधी भावनिक तर कधी रोमँटिक अशा कितीतरी गोष्टींना पर करत मी माझं अगदी सुरळीतपणे चालू ठेवलं होतं. पण म्हणतात ना खऱ्या प्रेमाला दृष्ट ही तितक्या लवकरच लागत असते. आणि तसेच माझ्याही बाबतीत झाले होते.

कालांतराने तिचं फोन करणं किंवा फोनवर कमी बोलणं जे सगळं माझ्या लक्षात येत होतं. कित्येकदा मी तिला म्हटलं होतं की आयुष्यभर जवळ असते त्यालाच प्रेम म्हटल्या जात नाही तर काही क्षणातही आपण त्याची प्रचिती आणू शकतो. पण ती ऐकायलाही तयार होईना. मी जंग जंग पछाडले. पण शेवटी तिने स्वतःच निर्णय आणि मला न सांगता निघून गेली ती कायमची....

तिचा नंबर असूनसुद्धा मी परत तिला कॉल करायचा प्रयत्न केला नाही. कारण जितके प्रयत्न मी तिच्याशी बोलण्याचा करायचो. तितकेच ती माझ्याशी लांबी तयार करत होती. शेवटी कुणाकडून तरी माहीत झालं की तिचं लग्न झालं आहे. ऐकतक्षणी हृदयात कसं धस्स झालं.

काही वेळ हे खोटं असेल असे वाटायला लागले होते पण वेडच प्रेम ते. आणखी काय विचार करणार. आणि त्याच्या विचार करण्याने घडलेली स्तिथी तर बदलू शकत नव्हती. मग तिच्या आठवणीत रुंजी घालू लागलो होतो. एका क्षणात तिने मला परका आणि पोरका दोनही

केलं होतं. आयुष्यात प्रेम केल्याचा पश्चाताप व्हायची पाळी आली होती. पण हे कुणाला मी सांगुही शकत नव्हतो.

रोज दिसणारा तिचा चेहरा कालांतराने नजरेआड जाऊन पुसटसा होऊ लागला होता. आणि तिच्या आठवणीने घेतलेली जागा पण कालांतराने ओसरायला लागली होती. पण मी माझं प्रेम विसरू शकत नव्हतो. कारण ते उघड्या हृदयाने मी केले होते. तिचं नाव निघालं की डोळ्यातून अश्रूंची धारा अलगद कशी निघून जायची कळत नव्हते.

सावरता सावरता मी कित्येक दिवसांतून स्वतःला स्वातंत्र्यमय केलं होतं. सांत्वन देणारे पण होतेच. पण जे सोडून जाते ते प्रेम नसतं असेपण कित्येक जणांनी खात्रीपूर्वक सांगितले होते. पण मला माहित होते की ज्या प्रेमाची मी पुष्टी केली होती ते असं आकर्षणाचं खेळ नव्हतं. जितकं माझं मन तडफडलं आहे तितकीच तीव्र जाणीव तिला माझी होईल असं वाटलं होतं. कारण मनापासून केलेली एकही गोष्ट आजपर्यंत निराश झाली नाही हे माझ्या लक्षात आलं होतं. त्यामुळे एक विश्वास अजूनही कायमच होता.

खात्री होती की ती नक्की येणार. मनात एक आशा ठेवून मी माझं मन अव्हेरत होतो. पण एक होतं तीच कॉन्टॅक्ट नेहमी माझ्या बहिणीसोबत राहिलं होतं. लग्नानंतरही तिचं कित्येकदा बोलणं होत राहायच. पण मला कधी तिच्याबद्दल विचारावास वाटलं नाही.

आपण प्रत्येकदा बघतो. जर कुणी प्रेम करणारे असे विलग झाले. तर काय करतात? सगळ्यात आधी ती माझी नाही तर कुणाची नाही असा प्रयत्न करतात. पण क्वचितच असा विचार करणारे असतील की ज्यांनी तिच्या मनाचा विचार केला असेल.

ती खुश आहे, सुखात आहे. पण आपलं प्रेम तिला मिळवण्यासाठी कमी पडलं या गोष्टीचा कुणी विचार करत नाही. बस तिच्या नावाने शिव्यांची राखरांगोळी वाहवत असतात. पण कधी एकदाही हा विचार करीत नाही की तिने निर्णय तरी कोणत्या परिस्थितीत घेतला असेल?

असो हे सगळं ओघात आलं म्हणून रीतं झालं. कारण काही कालावधीसाठी का असोना. माझ्याही मनात तेच भूत संचारलं होतं. मानसिकतेच्या दबावाखाली मीही काहीतरी कृत्य करायचं ठरवलं होतं. पण म्हणतात ना वेळेसारखं कोणतंच औषध नाही माणसाकडे. मोठ्यातलं मोठं दुःख घालवून देते ती वेळ.

आता दोन वर्षाच्या असीम प्रयत्नानंतर मी तिला विसरायचा पूर्ण प्रयत्न केला होता. आणि तो यशस्वीपणे पार पडला होता. कारण जेव्हा जेव्हा तिचं नाव ओठांवर किंवा कानावर यायचं. काही क्षणासाठी माझ्या हृदयात धस्स व्हायचं. पण आता काहीच वाटायला येत नव्हते. परत एकदा मित्रांच्यात जाऊन बसणे, टपरीवर हव्या त्या अश्लील चाळ्यामध्ये सहभाग घेणे चालू झालं होतं. परत एकदा कार्याची पूर्वतयारी चालू झाली होती. प्रेम हे एक मोह पण असते याची मला जाणीव झाली.

तो दिवस गुरुवारचा होता. नेहमीसारखं कट्ट्यावर जाताना अचानक एक फोन आला.. बघितलं तर बहिणीचा होता. कशासाठी आहे म्हणून मी मग रिसिव्ह केला आणि विचारलं..

हॅलो..

हा... काय आहे?

कुठे आहेस?

बस घरी पोचतोय.. दोन मिनिटात..

लवकर ये.. मला तुला काही सांगायचंय..

हो येत आहे.

असं म्हणून मी मग फोन ठेवला आणि विचार करू लागलो. कारण आजपर्यंत बहिणींचं आणि माझं कधीच पटत नसे. एकच घरी राहून आम्ही नेहमी परक्यासारखे होतो. कारण आमचे इगो कधीच एकमेकाला पटण्यासारखे नव्हते. पण तिने फोन केला माझ्यासाठी. ही म्हणजे निदान माझ्यासाठी तरी आश्चर्याची बाब होती. म्हणून मग घाईघाईने मी घरी आलो.

सगळं आवरून झाल्यावर, सगळ्यापासून वेगळं मला ताईने गच्चीवर काढलं आणि मग माझ्या तिच्याबद्दल एक एक सगळं सांगू लागली. तिच्याबद्दल ऐकल्यावर माझ्या मनात फार प्रमाणात धस्स होऊ लागलं. मला कळत नव्हते मी काय करावं? जीच्यासोबत इतकी अवहेलना केली तिच्यासोबत इतकं तरी वाईट व्हावं मला असं कधीच वाटत नव्हते. म्हणून थोडं हताशपणे ताईला विचारलं..

मी तिच्याशी भेटू शकतो काय?

अरे ती तुलाच भेटू इच्छित आहे. कारण झालेल्या गैरवर्तनाची तिला फार प्रमाणात जाणीव झाली आहे. आणि मलाही वाटतं तू तिला भेटावस आणि तिला सांत्वन द्यावस्...

कदाचित तू नसतही म्हणालीस तरी मी तिला भेटणारच होतो. कुठे आहे सध्या ती?

उद्या भेटेल ती तुला गांधीबागच्या मैदानात. मला माहित होतं... तू भेटणार म्हणून. आणि म्हणूनच मग मी तिला तिथे यायला सांगितलं..

थॅन्क्स ताई..

ह... अजून इतका मोठा नाही झालास.. मला थँकस म्हणण्यासाठी..

शेवटी ईगोच तो. शेवटी कितीही काळजी असली तरी मध्यंतरी यायचाच. असो पण हे एक मात्र बरं झालं की तिच्यामुळे माझी बहिण मात्र मला परत मिळाली. कित्येक दिवसांच्या पोटी आज ती माझ्याशी बोलली होती. तसं आमच्यात वादही तिच्यामुळेच आले होते. तिच्याच मोहात असल्या कारणाने मी ताईशी भांडण केलं होतं.

आज इतक्या दिवसांनी तिच्याबद्दल एखादी चांगली गोष्ट माहीत व्हायला पाहिजे होती. तर ही अशी बातमी मिळाली. ज्यामुळे मला तर माझ्यावरच वैताग आल्यासारखं वाटत होतं. आणि खरंच तिच्या आयुष्याचं फार चांगल्या प्रमाणात वाटोळं झालं होतं. ज्यामुळे परत एकदा माझी मानसिक स्थिती ताणल्या गेली होती.

आजची रात्र जाईल किंवा नाही असं वाटायला लागलं होतं. रात्रभर तिच्या आठवणीत डुंबून जाताना. झोप कशी काय आली काही कळत नव्हते.

थोडक्यात तिच्याबद्दल जरी काही सांगायचे असले तर जेव्हा तिचं लग्न झालं. तिला माझ्या बाबतीत कधीच विचार करावास वाटलं नाही. कारण मी समजून जाईन अशी तिची खात्री होती. पण तिच्या बाबतीत तिने घेतलेला योग्य तो निर्णय तो मात्र फार चुकीचा ठरला होता.

सूखा समाधानाचे दोन चार दिवस तिचे नातेवाईकांशी चांगल्या प्रमाणात घालवले. पण जेव्हा त्याने त्याचं खरं रूप दाखवलं. तेव्हा मात्र तिच्यावर आभाळ कोसळल्यागत वाटू लागले. रोज त्याचे दारू पिणे, चालायला किंवा बोलायला भान नसणे, बेभानपणे कुणावरही हात

उगरणे त्याने हा सपाटा चालू केला होता. त्याच्या या असल्या वागण्याचे कारण पण कळत नव्हते.

जर हिने त्याला समजावू पाहण्यास बघितले तर तिला तो मारझोड करण्यासही भित नसे. खरं तर तिला मिळवण्यासाठी त्याने किती तरी शब्दांची खोटी रेलचेल केली होती. एव्हाना हे तिच्या लक्षात पण आले होते. ज्यामुळे आता तिला पश्चात्ताप करण्यापलीकडे काहीच उरले नव्हते.

अलीकडे त्याच्या तशा वागण्याने तिच्या शारीरिकतेवर भलताच परिनाम झाला होता. गोजिर असणारं लावण्य तिचं, गालावर पांच बोटाची नक्षी केव्हाही उमटून दिसायची. ज्यामुळे ती नेहमी चेहरा कैद करून बाहेर निघायची. फुलासारखं गोड हसणारी.. फार प्रमाणात स्वतःचं हसूच विसरून गेली होती. त्यामुळे रडता पदर धरण्याशिवाय तिच्याजवळ आता मार्गच उरला नव्हता.

जीवनाला त्रासलेली तेव्हा तिच्या लक्षात आलं की तिच्या खट्याळपणात तिनेही कुणाचातरी मन दुखावलं होतं. ज्यामुळे तिला ही शिक्षा मिळाली होती. ह्या विचारांती तिला माझी आठवण झाली आणि तसं ताईला तिने फोन करून मला भेटायला सांगितलं होतं...

घड्याळात बघितले.. आठ वाजले होते. ज्यामुळे मला थोडी घाई होऊ लागली होती तिने दहा वाजता भेटण्याचं सांगितलं होतं. आणि आता फक्त माझ्याजवळ दोनच तास उरले होते. घाईघाई ब्रश केलं. आणि ब्रश करताच बाथरूमच्या आत गेलो. सगळ्यांना कळत नव्हते माझं काय चाललंय म्हणून. फक्त ताई मात्र दुरून बघत हसत होती.

बाहेर निघाल्यावर बेडवर कपड्यांचा ढिगारा उभा केला आणि तिचा आवडता गुलाबी रंगाचा शर्ट घातला. अस्ताव्यस्त झालेले केस आरशासमोर व्यवस्थित नीट केले. तिला काय काय आवडते? परत एकदा त्याची नोंद केली आणि ताईने सांगितल्यानुसार मी बाहेर निघालो.

गांधीबाग मैदान. बरंच नावाजलेले मैदान होतं ज्यामुळे आमच्या कितीतरी भेटी सहसा तिथेच व्हायच्या. पण अलीकडे होत असलेल्या इवटीझिंगच्या प्रकारामुळे फार प्रमाणात रिकामं मैदानच डोळ्याला दिसत होतं. नाहीतर आम्ही जेव्हा कॉलेजला असताना तिथं यायचो तेव्हा असं वाटायचं की अख्खं कॉलेज तिथंच भरलं आहे. कुणीतरी कुणासाठी नेहमी आतुरतेने वाट बघत बसायचे.

म्हटलं छान आहे. आज एकांत आहे. पण काय बोलणार तिच्याबद्दल? हाय कशी आहेस.. पण तिच्याबद्दल तर सगळं मला माहिती आहे. जेवण केलं काय? अरे हे काय म्हणतोय?हे सगळं विचारण्यासाठी तर मी इथे आलेलो नाही. पण काय करायचं? आता ती सिमाबद्ध आहे. आपण तिला साधं स्पर्शही नाही करू शकत. तेव्हा जी काही मौजमस्ती व्हायची आता ते जमणार नाही. माझं मलाच कळत नव्हते. मी जाग्यावर नसल्यासारखा विचारांच्या तंद्रीत इकडे तिकडे सैरावैरा पळत होतो.

शेवटी कुठूनतरी हवेच्या झोकेचा एक कानोसा आला. मी वडाच्या झाडाखाली बसून पारंब्यांचा चाळा करीत बसलो होतो. मागे वळून बघितलं.. ती येत होती. पण आज तिच्या चालीमध्येही मला ते तेज दिसेनासं झालं होतं जे मला अवगत होतं.

क्षणभरात ती माझ्याजवळ आली. मला बघून तिचा हर्ष फुलून आला. आज कितीतरी दिवसांनी जुन्या आठवणी जागवायला लागल्या. जवळ आल्यावर हाय म्हणून तिने हात उंचावले. पण परत मग एकदा मागे घेतले. उसने हसू आणल्यागत कसेतरी भकास हसली. आणि माझ्यापाशी येऊन बसली.

एकांत तर होताच. पण आमच्यातही कितीतरी क्षणांचा एकांत दाटला होता. मग सहज मीच म्हटलं.. कळलय ग मला सगळं तुझ्याबद्दल... आता तरी काही बोलशील का? क्षणभर ती गप्पच होती. आणि मग मी बोलता क्षणीच खांद्यावर डोकं ठेवून ती मला बिलगुन रडायला लागली.

रडून घे.... रडून घे... कारण हा तुझ्या विश्वासाचं खांदा आहे.. एकाएकी तुझी साथ नाही सोडणार.

............ ती मात्र मुसमुसत रडत होती.

काहीवेळ सांत्वन दील्यागत मी खूप वेळा तिच्याशी बोलत राहिलो. तिला समजावत राहिलो पण ती मात्र अक्षरशः पण बोलत नव्हती. तिच्या नजरेने मला जे काही सांगायचे होते. ते सगळं काही सांगून टाकले होते. शेवटी तिलाही गप्प राहून कंटाळा आला होता. हुंदके आवरत ती मला म्हणाली..

रोज मरतात रे मला... रोज मारतात... कधी एकदाही माझं विचार करत नाही.. मरून जाईन रे मी एक दिवस....

अग असं अभद्र काय बोलतेस... प्लीज असं बोलू नकोस... आपण मार्ग काढू ना यावर...

मला तर माझं मार्ग दिसतोय रे.. समोर माझं संपलेलं अस्तित्व दिसतंय... ज्याची फक्त मुठभर राख नजरेसमोर उडताना दिसतेय...

अग प्लीज यार... असं बोलू नकोस? बघ चूक झाली ना... प्रत्येकाच्याच हातून होते. म्हणून काय जीव दिल्याने मोक्ष प्राप्त होते का? देवानं जीव दिलाय तो असं घालवण्याकरीता नाही दिलाय. काहीतरी सार्थकी करावं अशीच त्याचीही इच्छा असते.

............ ती ऐकत होती आणि मी बोलत होतो.

जेव्हा तू लग्न केलीस. तेव्हा हे असलं सगळं होणार म्हणून तुला माहित होतं काय? जेव्हा घरी तुझ्या आई वडिलांनी तुला इतक्या लाडात वाढविली तुला. काय त्यांना याची जाणीव होती काय? प्रत्येक गोष्टी काळानुरूप घडत असतात ग. आणि कल आपण बघू शकत नाही. चूक झाली म्हणून आत्महत्या हा काही त्यावरचा उपाय नाही आहे. चूक सुधारण्याचा प्रयत्न करायचा. त्यामुळे आपल्या नवीन जीवनाची शुरुवात होऊ शकेल.

मग आता मी काय करू?

प्रयत्न कर. स्वतःला सावरण्याचा आणि इथून निघण्याचा. जिथे तुझं विश्व, तुझं स्वातंत्र्य तुझी वाट बघत आहेत. कारण हे तुझं विश्व नाही.

तुला काय वाटते... हे इतकं सोपं आहे...

अग जरी विचार केला तर जगात काहीही अशक्य नाही. कारण त्या अशक्यातच शक्य दडून बसला आहे.

पण तिथून निघाल्यावर कोण माझा आधार बनेल?

माझ्यावर विश्वास आहे..

खूप जास्त...

मग तो कायम ठेव कारण जर तुझ्याबद्दल आकर्षण असतं. तर आज इथे आलो नसतो. आणि तुला मदत करण्याचा हेतू नसता. माझं खरं प्रेम होतं तुझ्यावर. पण कदाचित तुलाच त्याची किंमत कार्य आली नाही.

कळत आहे रे मला... तू कुनविषयी बोलतो आहेस ते.. पण नव्हतं रे तेव्हा काहीच ध्यानात. आई वडिलांच्या दटावणित सर्वस्व मी अलगद डांबून टाकले आपल्या प्रेमाचे. कारण वाटलं होतं.. नवीन आयुष्याची शुरुवात अशी नव्याने होणार म्हणून.. पण नियतीने त्याची चांगलीच शिक्षा मला दिली.

अग काय बोलत आहेस तू? काय म्हटलं मी आत्ताच. तू एक स्त्री आहेस. जगाने तुला इतकीच पात्रता दिली आहे काय? की लग्न करायचं, नवऱ्याघरी जायचं आणि त्याचं मर खायचं. अग सहन करणाराही तितकाच पापी आहे की जितका अत्याचार करणारा. एक स्त्री म्हणजे काय कमी वाटली का तुला. वेळ आली तर तीसुद्धा एक वाघीण बनू शकते. हे दाखव ना जगाला. सहन तिथपर्यंत केल्या जाते जिथपर्यंत त्याची मर्यादा असते. आणि तू त्या मर्यादा केव्हाच ओलांडून टाकल्या आहेस.

फार शिकलास रे बोलायला..

अग परिस्तिथीच शिकवते माणसाला बोलायला. तू नाही मिळालीस म्हणून मी काय आत्महत्या करायचं ठरवेन असं वाटतं का तुला.. तुझं सुखी ज्यात होतं ना.. माझं आनंद पण त्यातच होता. पण वेडे मला तू एकदाही सांगितलं नाहीस. इतकं परका करून टाकलेस होतेस मला.

चुकले रे माझ्या राजा.. त्या एका चुकीमुळे माझ्यावर सर्वस्वी प्रेम करणाऱ्याला घालवले मी आयुष्यातून. मला माफ कर.

अग कसली माफी मागते आहेस. सोड ना आता त्या गोष्टी. आता आपण आपल्या आयुष्यात फार दूर आलो आहे. आपापल्या वाटेतल्या जीवनाचा विचार करायला हवं आता.

हो बरोबर आहे... आता काय करतो आहेस..

काही नाही दोन वर्षे इंजिनिअरिंग कोर्स करत होतो. आता यश पदरात पडेल अशी आशा आहे. नौकरीसाठी चालू आहे जाणे जिकडे तिकडे.

लग्न नाही केलंस अजूनपर्यंत... त्याच कारण काय आहे? जरा सांगशील का?

जाऊ देत ना.. काय विचारत आहेस तू..

अरे आज आपली शेवटची भेट आहे. कारण ध्यानीमनी नसताना मी तुझं हृदय किती दुखावलं आहे. हे इथे आल्यावर मला कळलं होतं. कारण आता समोर आयुष्यात आपण भेटणार याचे योग नाही दिसत मला समोर.

का बरं असं... का नाही भेटू शकणार...

आठवते का तुला. जेव्हा आपण इथेच येऊन बसायचो. तेव्हा तू म्हणायचास ना की असं चोरून लपून भेटण्यापेक्षा तुला तुझ्या वाट्याला दिवसाचे फक्त काही तास हवे आहेत माझे. काल मला ती गोष्ट आठवली. म्हटलं आयुष्य तर मी त्याचं नाही बनू शकले. पण त्याची इच्छा तरी पूर्ण व्हायलाच पाहिजे. आठवते का?

हो आठवते ना... कारण ते काही आयुष्यभर पुरायला हवेत असे पाहिजे होते मला. ते काही तास माझ्या आठवणींचे क्षण आयुष्यातले सुखद क्षण असावे असे वाटायचे मला. आणि तीच इच्छा मी त्या दिवशी जाहीर केली होती.

आज सगळ्याच इच्छा पूर्ण करून घे. कारण अर्धवट मला काहीच ठेवायचं नाही रे. त्या एका चुकीच्या पावलाने माझ्या अख्ख्या आयुष्याची वाट बदलली. पण मला मात्र तुझ्याशी तरी शेवटची प्रामाणिक राहू दे...

तू का अशी वेंधळलेल्या सारखी बोलते आहेस. मला काही वेळा तुझं बोलणंच समजत नाही. बरं ते जाऊ दे...

जेवण केलंस का?

नाही रे.. इच्छाच नाही होत जेवायची. सगळ्या इच्छा आकांक्षा नासून गेल्या आहेत.

बरं मला सांग मग ... नेमकं काय करायचं ठरवलं आहेस आता तू...

मला काही सुचत नाही रे.. काय करावं? कुठं जावं?मला एखाद्या तुरुंगात असल्यासारखं वाटतं. एखाद्या तुरुंगाधिकारी सारखं येतो आणि कैद्या प्रमाणे तो माझ्यावर वार करतो. रोज त्या दारूचा उग्र दर्प घेऊन संतापले मी..

होईल ग सगळं नीट.. मी आहे तुझ्या धिराशी.. फक्त स्वतःचं समाधान ठेव.. अगदी शेवटपर्यंत कोणत्याही टोकाला मी तुझ्याबरोबर सोबत आहे.

जेव्हा तिला वाटायला लागलं की तिचे सगळे दुःख माझ्या कानावर टाकून ती आता थोडी फ्री झाली आहे. ती थोडफार हसायला लागली होती. आज कितीतरी दिवसांनी का होईना. ती मला तेव्हढीच माझी वाटत होती. जेव्हा याच्या आधी ती माझी होती. सुखदुःखाच्या वाटेवर मी तिच्या आयुष्यात असलेला पहिला प्रवासी होतो. ज्याने शुरुवातही तिथूनच केली होती आणि शेवटही तिथेच झालं होतं.

असं वाटत होतं तो दिवस असं कधीच संपू नये. सतत हातात असलेला तिचा हात, आज तिच्या खऱ्या प्रेमाची ग्वाही देत होता. पण नजरेला नजर मात्र जुळत नव्हती. जसं इथून निघाल्यावर तिला काही वाईट करायचंय.

बऱ्यापैकी मी तिला जीवन जगण्यावर प्रेरित केलं होतं. कारण कितीही करून मी तिचा हात धरून समाजामध्ये चालू शकलो नसतो. एक मित्र म्हणून नेहमी तिच्या पाठीशी मात्र राहण्याचे वचन दिलं होतं.

दुःखाचे आणि सांत्वणाचे पाठ वाहून गेल्यावर शेवटी जर तर चे प्रसंग तयार होऊ लागले. उलट मलाच ती बोलू लागली की मी लग्न करावं.. संसार मांडावा. खरं तर तिच्या अजुनही फार अपेक्षा होत्या माझ्याकडून.

सहज एक गमतीची गोष्ट माझ्या ओठावर आली आणि तिच्या ओठावर एक सुंदरशी स्मित मनात घर करून गेली. क्षण दिशी मी म्हटलं... अशीच हसत रहा ग.. फार छान दिसतेस... पण नजर लागल्यागत बीचारीच हसू मावळले. आणि परत काळजीचे स्वर कानावर आले.

खरंच रे तुझ्या सहवासात आजचा दिवस कसा गेला काही कळलंच नाही. पण खरं सांगू, ही शेवटची भेट आयुष्यभर माझ्या आठवणीतली असेल रे.. जगण्याचा एक नवा मार्ग देऊन

गेली ही. शेवटची भेट. आज तुला भेटलो.. तुझ्याशी बोललो.. माझ्या मनावरचं फार दिवसांच ओझं कमी झालं.

यानंतर का ग नाही भेटू शकणार?होऊ शकते तुझ्या नव्या जीवनाची शुरुवात असेल. तर यानंतरही आपल्या भेटी होऊ शकतात. शेवटची भेट म्हणून असं तू नशीब नाही सांगू शकत.

प्रत्येक गोष्टीला काही कारण असतात माझ्या राजा.. काही समजून येतात तर काही कोड्यात असतात. निर्णय तेव्हढा स्वतःचा स्वतःचं करावं लागतो.

पण गोष्ट तरी कोणती महत्त्वाची आहे .... कळू देशील का जरा...

कळेलच तुला कधीतरी.. बरं एक करशील.. राजा माझ्यासाठी..

तू बोलून तर बघ ग..

तुझी एक आठवण दे ना मला.. ज्याला हक्काने मी माझं म्हणून जपत राहणार... जेव्हा तू नसणार ना माझ्या जवळ... तेव्हा आवर्जून मी त्याला तुला बघितल्यासारखा डोळ्यात साठवणार..

माझ्याकडे शिवाय या दुपत्त्याला सोडून काही नाही ग.. आणि तो दुपट्टा मी तिच्या स्वाधीन केला.

आता निरोप घेतो माझ्या राजा.. कारण सुखाचे हे चार क्षण पदरात पडले हेच माझ्यासाठी फार मोठे वरदान आहेत.

काळजी घे ग स्वतःची.. आणि सांभाळ स्वतःला..

निघताना तिने एकदाही फिरून बघितले नाही. कदाचित तिचा निर्णय ठरला होता. परतताना मला वाटेत बघून तिला कसलाही आधार सोडायचा नव्हता. शेवटी तेच झाले के व्हायचे होते. तिने मला सांगितल्याप्रमाणे ती माझी आणि तिची शेवटची भेट होती. आयुष्यभराचे काही तास मला देऊन ती शेवटचीच निघून गेली होती.

कालांतराने एक बातमी हवेसारखी कानावर आली. असं कळून आलं की तिने तिच्या नवऱ्यावर वार करून त्याला ठार केले आणि स्वतःही त्याच दुपट्ट्याने फाशी लागली. पण त्याही वेळेस एक वेगळीच मुद्रा तिच्या चेहऱ्यावर होती. एक समाधान होतं. कारण आज ती मुक्तपणे आकाशात संचार करत होती. स्वतच्या वेगळ्या अस्तित्वाने आणि वेगळ्या स्वातंत्र्याने..

शेवटचा फक्त एक लेटर माझ्यापर्यंत आला होता. तोही कुणीतरी अज्ञात व्यक्तीने माझ्याकडे दिला होता...

प्रिय....

आयुष्यात माझ्यावर प्रेम करणारा कुणी असेल... तर तू आहेस राजा.. आणि माझ्यावर कुणी खरं प्रेम करणारं असेल तर तोही तूच आहेस. आयुष्यातली ही एक चूक कधी वाटले नव्हते की इतकं सगळं काही माझ्या हातून सुटून जाईल. पण रणरणत्या उन्हाचे चटके सोसूनही वाळवंट तितकाच तापलेला होता रे... त्यामुळे मला असं कधीच वाटलं नाही. आयुष्य अजून समोर असेल. हरले होते रे मी आयुष्याला... पण तुझ्याशिवाय काही सुचतच नव्हते.

म्हटलं तेव्हा विचार केला नव्हता तरी तो माझ्यासाठी माझ्याबरोबर होता. मग आता जाता जाता त्याचा विचार नाही केला तर हा नस्तिकपणा नसेल का?

इतकं सगळं होऊन गेल्यावरसुद्धा मला खात्री आहे. तू मला कधीच एकटं सोडलं नसतास. कारण तुझ्यासाठी मी अजुनही तितकीच होते. पण सांगू राजा... जग हे घोळक्याने असते रे.. आणि त्यातून मी आधीचीच दुसऱ्याच्या शेवाऱ्याला विणलेली... कुणी मला काही बोललेले.. मी ऐकलं असतं... पण माझ्यासाठी असं तुझं आयुष्य वाऱ्यावर गेलेलं मला आवडलं नसतं रे...

माझ्यासाठी तु काय करू शकतोस... हे तर अजूनही तुझे डोळेच सांगतील... पण खरं तर आयुष्यभर पुरेल इतकं प्रेम त्या काही तासांत तू मला दिलंस... मला माहित होतं.. माझ्या असण्याने तुझ्या अस्तित्वात फार बदल होणार होता. म्हणून ठरवलं की माझंच अस्तित्व संपवायचं. कारण मला मुक्त व्हायचं होतं.. पण एक इच्छा आहे राजा...

तू लग्न करावस. तुझं एक सुखी संसार मांडावस. मी वाट बघत असेन तुझ्या मुलीच्या कांतीने जन्म घेऊन. पण तूर्त कसलाही विचार न करता करशील ना राजा.

मान्य आहे अवघळ होतं रे सगळं, पण करावं लागलं. जाताना निरोप दिला नाही आणि आत्ताही घेणार नाही. कारण मला यायचंय.. तुझ्यापाशी.. तुझी म्हणून..

तुझीच....

हे सगळं ऐकून परत एकदा माझ्या डोळ्यात पाणी आलं. पण मी तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा निर्णय घेतला.....

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. कार्तिक हजारे यांचं हे तिसरं पुस्तक.**

चंद्रपूर सारख्या ग्रामीण भागात राहून साहित्यसेवा करणारे श्री कार्तिक हजारे यांच्या लेखणीतून अतिशय संवेदनशील मनाचे दर्शन होते. त्यांच्या हळव्या भावुक प्रेमकथांचा एक मोठा चाहता वर्ग आहे. त्यांच्या पहिल्या दोन्हीही पुस्तकांना तरूण वाचकांचा फ़ार मोठा प्रतिसाद मिळाला. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत.

ई साहित्य प्रतिष्ठान

त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?